कृषीवल

रायगड ॥ रविवार, दिनांक १९ डिसेंबर २०२१

किंमत ४ ₹

आज रंगड्यांच्या तोंडी नाव आहे ते हरनाज संधूचं. तब्बल २१ वर्षानंतर हरनाजने भारताला मिस युनिव्हर्स स्पर्धेत यश मिळवून दिलं. कोणाच्याही ध्यानीमनी नसताना हरनाजने यंदाच्या मिस युनिव्हर्स स्पर्धेचं किताबही पटकावलं आणि अवघ्यांचा धक्का दिला. पंजाबमधल्या छोट्याशा गावाच्या हरनाजचा आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या सौंदर्यस्पर्धेपर्यंत मोहोपर्यंतचा प्रवास थक्क करणारा आहे. जगाला लाभलेल्या या नव्या मिस युनिव्हर्सबद्दल...

PEN - Dist Raigad

Commercial space Sale/Lease 6000+sft on Ground & First Floor Strategic location

Available Few Residential Flats.

98190 32829
98193 74959

शिवसेनेतील कदम -परब वाद चिघळला

ऐन निवडणुकीच्या तोंडावर परस्परांवर आरोप-प्रत्यारोप

शिवसैनिक नाराज

। मुंबई । प्रतिनिधी ।

परिवहन मंत्री ॲड.अनिल परब आणि शिवसेना नेते रामदास कदम यांच्यातील राजकीय संघर्ष चव्हाट्यावर आला असून,शनिवारी मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेत रामदास कदम यांनी परब हेच शिवसेनेसाठी गद्दार असून,त्यांच्यामुळे पक्षाची अधोगती झाल्याचा आरोप त्यांनी केला. तर परब यांनी याबाबत पक्षप्रमुखच निर्णय घेतील असे सुचित केलेले आहे.

परिवहन मंत्री ॲड.अनिल परब यांच्यामुळेच शिवसेनेची अधोगती सुरु असल्याचा आरोप

> *मी मरेपर्यंत शिवसैनिक राहिन. मला पक्षातून काढलं तरी मी सेनेची साथ सोडणार नाही. मात्र, मुलांसमोर राजकीय पर्याय आहेत. त्यांना स्वत:चं राजकीय भवितव्य आहे.*
> *– रामदास कदम, शिवसेना नेते*

•› पान २ वर

> *त्यांनी काही म्हणू दे. माझ्यावर काही जरी आरोप केले तरी त्यावर त्याचं उत्तर मी देणार नाही. मी एक शिवसैनिक आहे ते शिवसेनेचे नेते आहेत. याबाबतची जी काही दखल घ्यायची आहे ती पक्ष घेईल. – ॲड.अनिल परब, परिवहन मंत्री*

'सहकार क्षेत्रात राजकारण नको'

। अहमदनगर । प्रतिनिधी ।

मी सहकार क्षेत्र तोडायला आलो नाही, जोडायला आलो आहे. पण राज्य सरकारनेही राजकारण बाजूला ठेवून सहकाराकडे पाहावं. कारखान्याचे संचालक कोण आहे, कोणत्या पक्षाचा आहे, या आधारावर अर्थपुरवठा करू नये, असा सल्ला केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी दिला आहे. अहमदनगर येथे आयोजित करण्यात आलेल्या पहिल्या राष्ट्रीय सहकार परिषदेत ते बोलत होते.

प्रवरानगरमध्ये शनिवारी पहिली सहकार परिषद पार पडली. यावेळी केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा बोलत होते. या प्रसंगी

•› पान २ वर

बँका वाचविणार

आम्ही बँका वाचवण्यासाठी जे काही करायचं ते करू. बँका वाचवण्यासाठी आता नव्या कमिट्या स्थापन करणार नाही. कमिट्या तयार करून वेळ घालवणार नाही. अनेक समित्या बनल्या, अनेक अहवाल आले. अहवाल रद्दीत गेले. कशाचीच अंमलबजावणी झाली नाही. त्यामुळे समितीची गरज नाही. तुमच्यासोबत बसून समस्या समजून त्या मार्गी लावू, असंही त्यांनी सांगितलं. येणाऱ्या काळात नवं सहकार धोरण आणणार असल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं.

महत्त्वाचे

सीएनजी,पीएनजी दरातही वाढ

। मुंबई । प्रतिनिधी ।

सीएनजी दरात किलोमागे दोन रुपयांची वाढ करण्यात आली आहे. या वाढीमध्ये कराचा समावेश आहे. एलपीजी पीएनजीच्या दरातही प्रति किलो दोन रुपयांनी वाढ करण्यात आली आहे. आता मुंबईत नवीन दर ६३.५० रुपये प्रतिकिलो झाला आहे. त्याच वेळी, मुंबईतील सुधारित किंमत ३८ रुपये प्रति युनिटवर गेली आहे.

सपा नेत्यांवर धाडी

। लखनौ । वृत्तसंस्था ।

आयकर विभागाच्या पथकाने शनिवारी माजी मुख्यमंत्री अखिलेश यादव आणि सपा नेत्यांच्या लखनऊ, मैनपुरी, मऊ येथील घरं आणि कॅम्प ऑफिसवर छापे टाकले. मैनपुरीचे मनोज यादव, माजी मुख्यमंत्र्यांचे ओएसडी जैनेंद्र यादव आणि मऊचे राजीव राय यांच्यासह डझनहून अधिक नेत्यांचा यात समावेश आहे.

कर्नाटकात शिवपुतळ्याची विटंबना

। मुंबई । प्रतिनिधी ।

कर्नाटकातील बंगळुरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याची विटंबना करण्यात आली.याबाबतचा व्हीडीओ सर्वत्र व्हायलर होताच त्याचे तीव्र पडसाद महाराष्ट्रात सर्वत्र उमटले. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी याबाबत बंगळूरमधील समाजकंटकावर कडक कारवाईसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कर्नाटक सरकारला कडक कारवाईचे आदेश द्यावेत,अशी मागणी केलेली आहे.

बंगळूरमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याबाबत अघटीत घडले आहे, तर त्याची कसून चौकशी करायलाच हवी. या प्रकाराकडे डोळेझाक करू नका, असे ते म्हणाले.

मुख्यमंत्री ठाकरे म्हणाले की, गेले कित्येक वर्ष कर्नाटकमधील मराठी बांधवांवर अत्याचार केला जात आहे. आता तर शिवरायांसारख्या आपल्याआराध्य दैवताची विटंबना करण्याची घटना घडते. तेथील सरकार याकडे डोळेझाक करते, हे दुर्दैवी असल्याचे त्यांनी सांगितले.

माथेरान घाटात अपघातात दोघे गंभीर जखमी

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील कोल्हारे आदिवासी वाडी आणि तळवडे आदिवासी वाडीमधील दोन तरुण माथेरान येथून नेरळ कडे दुचाकीवरून येत असताना अपघात झाला. या अपघातात जखमी झालेल्या दोन्ही तरुणांना पनवेल येथे उपचारासाठी दाखल केले आहेत.

विनोद रामा वाघे हा आपला मित्र जहिरुद्दीन शेख हे दोघे माथेरान घाटातून नेरळ येथे होते. त्यांची दुचाकी एमएच ४६, एए ९९९२ ही यामाह कंपनीची बाईक नेरळ येथून माथेरानकडे प्रवासी कार एमएच १४-सीएक्स ७४८५ या गाडीवर जाऊन आदळली. त्यावेळी दुचाकीस्वार जाहिरउद्दीन शेख सोबत दुचाकीवर मागे बसलेला कोल्हारे वाडीमधील तरुण विनोद रामा वाघे हा दुचाकीवरून अलगद उडून कारवर कोसळला. त्यावेळी विनोद वाघेच्या डोक्याला मार लागून जखमी झाला. तर दुचाकीस्वार तरुण शेख यांच्या पायाला आणि हाताला दुखापत झाली,नेरळ येथे प्राथमिक उपचार करुन पनवेलला दाखल करण्यात आले.

आयुर्वेदिक खो-गो®

60 YEARS OF TRUST

कफ-पिल्स

खोकल्यावर अत्यंत गुणकारी गोळया

कोरडा खोकला
घशातील खवखव
घसा दुखणे
ह्यावर गुणकारी

सर्व केमिस्टमध्ये उपलब्ध

कफ सुटून घशाला त्वरीत आराम मिळतो.

TRADE MARK

अहिल्या आयुर्वेदिक औषधालय, मुंबई ६३.
HelpLine No:+91 8108130009 • www.khogo.in

मालवाहू टेम्पोला एक्स्प्रेस वे वर आग

। खोपोली । वार्ताहर ।

मुंबई -पुणे एक्स्प्रेस वे वर सायमळ दरम्यान पुणे लेनवर टेम्पोला अचानक आगल्याची घटना शनिवारी १८ डिसेंबर रोजी दुपारच्या दरम्यान घडली. आगीत चालकाची केबीन जळून खाक झाली तर प्रसंगसावधतेमुळे चालकाचा जीव बचावला.

पुणे लेनवरून टेम्पो जात असतानाच इंजिनभधून अचानक आवाज येऊन केबिनला आग लागली. ते पाहून चालकाने प्रसंगसावधता बाळगत उडी मारली. आरबीआय अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी पोहोचून आग विझविली आहे. यादरम्यान काही काळ वाहतूककोंडी झाली होती. देवदूत, अपघातग्रस्तचे सदस्यानांनी परिस्थिती हाताळत वाहतूक सुरळीत केली आहे.

लुकमाने हयात तेल®

भाजणे, पोळणे, कापणे, मुरगळणे, सुजण, मुकामार, मुळव्याध, जखमा, अंगमसाज या वेदनांवर गुणकारी।

Mfg. By: M/s Amzelia, MUMBAI. • Tel.: 022-23441456 • www.lookmanehayattel.com | सर्व स्टोअर्स आणि केमिस्ट मध्ये उपलब्ध

KHOJATI Over 150 Years SINCE 1847

काळानुसार बदलत जाणारी परंपरा

K-Veda®

KHOJATI® SINCE 1847

प्रत्येक घोटात आध्यात्मिक पवित्र दिव्य चवीचा अनुभव घ्या. रोग प्रतिकारक शक्ती वाढवणारे निगेला (कलौंजी) आणि विटामीन सी युक्त

कलौंजीप्राश गोल्ड

पुरुषांसाठी एक संपूर्ण परिपूर्ण पॉवर टॉनिक

कलौंजीप्राश सिल्वर

आपल्या संपूर्ण कुटुंबाची रोग प्रतिकारक शक्ती वाढवते

कलौंजीप्राश महिलाओं के लिए

स्त्रियांचे निरोगी आरोग्यराखण्यासाठी

सिमसिम पैन रिलीफ एक्टिव

जेव्हा एक्टिव रहा

कंबर दुखी,लचक,मांस पेशी आणि सांधे या पासून त्वरीत आराम

खोजाती® त्रि-फलांजन®

दृष्टि वाढ़वण्या मध्ये मददगार

त्रिफला, मध व एरंडेल यांनी बनवलेले दृष्टी वाढवणारे एक मात्र अंजन

डोळ्यांना थंडावा देऊन दृष्टी स्वच्छ व निरोगी ठेवते

टिंकल आय ड्रोपस असली गुलाबच्या अर्क युक्त

नाजूक व दमलेल्या डोळ्यांना त्वरीत थंडावा देणारा

खोजाती® तूप अंजन®

नो जलन ,नो थकन

आयुर्वेदीक युनानी पद्धतीने गाईच्या शुद्ध तुपा पासून बनवलेले अंजन

ट्रॉय -वॉश हर्बल त्रिफला ऑय वॉश

डोळ्यांना त्वरीत थंडावा देणारा

टि.व्ही., कॉम्प्युटर मोबाईलच्या अति वापराने होणाऱ्या त्रासाबद्दल रोज वापर करण्यासाठी शितल ट्राय वॉश

KHOJATI AYURVED PHARMA | 022-23462600 | www.kveda.com

AVAILABLE IN LEADING MEDICAL AND AYURVEDIC STORES. @kvedabykhojati @kvedacare

अभीष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१९ डिसेंबर

१) श्रीम. अलका अशोक पाटील, नागडोंगरी अलिबाग
१९ डिसेंबर १९५३

२)श्रीम.विठाबाई लक्ष्मण बना कोळीवाडा, अलिबाग
१९ डिसेंबर १९५२

३)श्रीम.शिला, भालचंद्र रोकडे सेंट मेरी स्कूलजवळ,अलिबाग
१९ डिसेंबर १९४१

म ह त्त्वा चे

स्वस्त धान्याचा काळा बाजार

मुंबई : गोरेगाव परिसरामध्ये गेल्या अनेक दिवसांपासून मोठ्या प्रमाणात स्वस्त धान्याचा काळा बाजार सुरू असून, याप्रकरणी मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी आरे परिसरामध्ये असलेल्या एका गोदामावर छापा टाकला आहे. या छाप्यामध्ये काळ्या बाजारात जाणारे २५ लाख रुपयांचे स्वस्त धान्य जप्त करण्यात आले आहे. या कारवाईमध्ये पोलिसांनी वीस जणांना ताब्यात घेतले आहे. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.

सोमजाईदेवी रथउत्सव सप्ताह

। श्रीवर्धन । वार्ताहर ।

परिसराची ग्रामदेवता श्रीसोमजाई देवीचा रथउत्सव प्रतिवर्षाप्रमाणे श्रीसोमजाई देवी देवस्थान ट्रस्टतर्फे सोमवार दि. २० डिसेंबर २०२१ ते मंगळवार दि.२८ डिसेंबर २०२१ या कालावधीत संपन्न होणार आहे. तरी या उत्सवात सहभागी होण्याचे आणि महत्त्वाचे म्हणजे सहभागाप्रसंगी आरोग्यविषयक निर्बंधाचे पालन करण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

शेकापमुळे सापडले हरवलेले उद्यान

*** कामोठे सेक्टर ५ च्या उद्यानाचा सिडको प्राधिकरणाला विसर * शेकाप चिटणीस अमोल शितोळे यांची लक्षवेधी भूमिका**

। पनवेल । वार्ताहर ।

शहरातील कामोठे सेक्टर ५ परिसरातील दूरवस्थेत असलेल्या उद्यानाकडे शेतकरी कामगार पक्षाचे कामोठे चिटणीस अमोल शितोळे यांनी सिडको प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. प्रशासनाकडून दुर्लक्षित झालेल्या या उद्यानाची व्यवस्था लावण्याची विनंती शेकापकडून करण्यात आली असून, प्रसंगी आंदोलनाचा इशारासुद्धा देण्यात आला आहे.

भूखंडात श्रीखंड शोधणाऱ्या आणि व्यापारी दृष्टिकोन ठेवून काम करणाऱ्या सिडको प्राधिकरणाकडून कामोठे वसाहतीतील सेक्टर ५ येथील उद्यानाचे विस्मरण झाले होते. अशा प्रकारचे उद्यान आपल्या नकाशावर असण्याची माहिती सिडकोच्या अधिकारी वर्गाला नव्हती. आणि यामुळेच जनसामान्यांचा कैवार राखणाऱ्या शेतकरी कामगार पक्षाला सिडको प्रशासनाच्या डोळ्यांत अंजन घालण्याची भूमिका घ्यावी लागली आहे.

पनवेल परिसराचे दिवसागणिक महानगरात रुपांतर होत असून, शहरातील कामोठे वसाहतीची लोकवस्ती दिवसेंदिवस वाढत आहे. पण लोकसंख्येच्या तुलनेत उपलब्ध असलेल्या किंवा होत असलेल्या सुविधांची वानवा कामोठेवासी सातत्याने अनुभवत आहेत. आणि यासंदर्भातील प्रकार पुन्हा एकदा उजेडात आला आहे.

आजही या परिसरात उद्यान आणि खेळाचे क्रीडांगण विकसित करण्यात आले नाही. एकूण लोकसंख्येच्या तुलनेत अत्यंत कमी गार्डन या वसाहतींमध्ये आहेत. एक दोन ठिकाणी अशा प्रकारच्या सुविधा देण्यात आल्या असल्या, तरी याकडे सिडकोचे सातत्याने दुर्लक्ष होत आहे. सेक्टर-५ येथे उद्यानासाठी राखीव असलेला भूखंड सिडकोने विकसित केला. याठिकाणी विरंगुळा केंद्रासह, लहानसे चिल्ड्रन पार्क तसेच जॉगिंग ट्रॅक निर्माण करण्यात आले. पण निर्मितीनंतर सिडकोने त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. दरम्यान, या उद्यानाची मोठ्या प्रमाणात दूरवस्था झाली आहे. येथे तयार करण्यात आलेले विरंगुळा केंद्र धुळीत माखलेली आहे. आतमध्ये कचरा, प्लास्टिक पडले असून या केंद्राचा ज्येष्ठ नागरिकांना वापर करता येत नाही. या व्यतिरिक्त चिल्ड्रन पार्कचीही दूरवस्था झाली आहे. परिणामी सुविधा असतानाही त्याचा लाभ चिमुकल्यांना घेता येत नाही. जॉगिंग ट्रॅकवर मोठ्या प्रमाणात पाला आणि पाचोळा त्याचबरोबर वाळलेली लाकडे पडलेली आहेत. या कारणामुळे नागरिकांना येथे फेरफटका मारता येत नाही. या उद्यानामध्ये शोभेच्या झाडांऐवजी जंगली झाडे झुडपे मोठ्या प्रमाणात आहेत. याकडे सिडकोचे दुर्लक्ष झाल्याने रहिवाशांना गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे. या उद्यानाची देखभाल आणि दुरुस्तीचे विस्मरण प्राधिकरणाला पडले. अशा प्रकारचे उद्यान आपल्याकडे आहे, याबाबत अधिकारीसुद्धा अनभिज्ञ असल्याचे शेतकरी कामगार पक्षाच्या निदर्शनास आले.

यास्तव शेतकरी कामगार पक्षाचे कामोठे चिटणीस अमोल शितोळे यांच्यासह गजानन साळुंखे, अल्पेश माने, मधुकर सूरते, शुभांगी खरात यांनी सिडको अधिकाऱ्यांची भेट घेऊन दुर्लक्षित उद्यानाबाबत लक्ष वेधले. शेकापच्या या कृतीनंतर उद्यानाबाबत अनभिज्ञ असणारे सिडको प्रशासन जागे होत, हे उद्यान शोधू लागले. काही वेळात हे उद्यान आपल्या नकाशावर असल्याचे अभियांत्रिकी विभागाच्या स्थानिक कार्यालयीन अधिकाऱ्यांच्या लक्षात आले. तसेच उद्यानासंदर्भात शेकापकडून देण्यात आलेल्या निवेदनावर, लवकरात लवकर कार्यवाही करण्याची ग्वाही सिडको प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

> **सेक्टर ५ मधील उद्यानात सिडकोने विरंगुळा केंद्र बांधले. पण त्याचा वापर होत नाही. कारण ते सुस्थितीत नाही. यामुळे लवकरात लवकर हे उद्यान सुस्थितीत रहिवाशांसाठी खुले करावे, अशी मागणी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने सिडकोकडे करण्यात आली आहे.**
>
> **-अमोल शितोळे,** कामोठे चिटणीस, शेतकरी कामगार पक्ष

लष्करभरती संदर्भात मार्गदर्शन

। अलिबाग । शहर वार्ताहर ।

नगरातील स्पर्धा विश्व अकॅडमीच्या अभ्यासिकेत लष्कर भरती संदर्भात मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात भारतीय लष्कर सेवेतील सोल्जर मयुरेश गावंड यांनी उपस्थितांचे भारतीय लष्कर सेवा आणि भरती प्रक्रिया यासंदर्भात मार्गदर्शन केले.

जिल्ह्यातील युवावर्ग मोठ्या प्रमाणात स्पर्धा परीक्षांची तयारी करत असून, याकामी स्पर्धा विश्व अकॅडमी महत्त्वाची भूमिका बजावत आहे. आणि याच पार्श्वभूमीवर अकॅडमी विविध स्तरावर मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याचाच एक भाग म्हणून, मानवी हक्क दिनानिमित्त लष्करभरती मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी दिवंगत लष्करप्रमुख बिपीन रावत यांना आदरांजली वाहण्यात आली.

या कार्यक्रमात राष्ट्रसेवक म्हणून काम पाहताना किंवा त्यासाठी भारतीय सेवेत रुजू होताना सर्वप्रथम आत्मिक विकासाकडे लक्ष देणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन मयुरेश गावंड यांनी केले. तर शारीरिक सुदृढता, सकस आहार, व्यायाम यासंदर्भात राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी तपस्वी गोंधळी यांनी मार्गदर्शन केले.

मार्गदर्शनाअंती उपस्थितांच्या शंकाकुशंकाचे निरसण करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अकॅडमीच्या संचालिका सूचिता साळवी, सूत्रसंचालन मानसी नागावकर तर आभारप्रदर्शन प्रतिक कोळी यांनी केले.

दत्तमंदिराचा जिर्णोद्धार व लोकार्पण

। जेएनपीटी । वार्ताहर ।

उरण तालुक्यातील दत्त भाविकांचे श्रद्धास्थान असलेले चिरनेर कातळपाडा परिसरातील श्रीदत्तात्रयांचे देवस्थान मंदिराचा जीर्णोद्धार तथा लोकार्पण सोहळा नुकताच पार पडला.

या श्रीदत्तात्रेय मंदिराचा जीर्णोद्धार चिरनेर कातळपाडा यांच्या श्रमदानातून तथा लोकवर्गणीतून करण्यात आला असून, याप्रसंगी शेकापचे चिटणीस सुरेश पाटील, काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, समाजसेवक पी.पी. खारपाटील समाजसेवक पी.पी.खारपाटील, उरण पंचायत समितीच्या उपसभापती शुभांगी पाटील, जिल्हा परिषद सदस्य बाजीराव परदेशी, यशस्वी उद्योजक संजीवकुमार भगत, उद्योजक राजा खारपाटील, सरपंच संतोष चिर्लेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

पोलिसांचे ऑपरेशन 'ऑल आऊट'

नवी मुंबई : थर्टी फस्टच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी मुंबईत ऑपरेशन ऑल आऊटला सुरुवात केली आहे. या अंतर्गत रेकॉर्डवर असलेल्या गुन्हेगारांचा शोध घेण्यात येत आहे.

तसेच अनेक ठिकाणी नाकाबंदी करून वाहनांची तपासणी देखील करण्यात येत आहे. वाहतुकीचे नियम मोडणारे व कोरोना नियमांचे उल्लंघन करणाऱ्या नागरिकांवर कारवाई सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

तसेच नागरिकांना कोरोनाच्या नियमांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

खालापूरकर शेकापला विजयी करुन विरोधकांना चपराक देतील

जिल्हा सहचिटणीस किशोर पाटील यांचे प्रतिपादन

। खोपोली । प्रतिनिधी ।

खालापूर नगर पंचायतीच्या हद्दीत संतोष जंगम यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या प्रमाणात विकासकामे झाली असतानाही विकासकामे झालीच नाहीत,अशी बोंब मारणाऱ्या विरोधकांना सुज्ञ खालापूरकर शेकापला विजयी करुन मतदान करून चोख उत्तर देतील, असे प्रतिपादन जिल्हा सहचिटणीस किशोर पाटील यांनी केले आहे. शिवसेना नेत्यांकडून केल्या जात असलेल्या टीकांवर त्यांनी पलटवार केला आहे.

खालापूर नगरपंचायतीच्या निवडणुकीत राजकीय वातावरण आता तापायला लागले आहे. आरोप आणि प्रत्यारोपाच्या फैरी झडू लागल्या आहेत. शेकापक्षाच्या विरोधात शिवसेनेने दोन्ही तालुक्यातील नेते आणि कार्यकर्त्यांची मोठी फौज मैदानात उतरवली आहे. आ. महेंद्र थोरवे प्रचारात उतरले असून, शेकापवर भ्रष्टाचार आणि कामे झाली नसल्याचा आरोप केला जातोय.

याच निराधार टीकांना चोख प्रत्युतर देण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाचे नेते प्रचारात उतरले असून शेवटच्या टोकापर्यंत पोहोचून पक्षाकडून करण्यात येणाऱ्या विकासकामांचा अजेंठा पोहचविण्यासाठी शेकापक्षाचे जिल्हासहचिटणीस किशोर पाटील, तालुका चिटणीस संदीप पाटील, खोपोली शहर चिटणीस अविनाश तावडे, मधुकर शिंदे वाड्यावस्त्यावर फिरत आहेत.

यादरम्यान किशोर पाटील यांना पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना म्हणाले की, प्रतिकूल परिस्थितीत नगरपंचायतीची स्थापना झाल्यावर संतोष जंगम यांनी निधी उपलब्ध करीत नगराध्यक्ष शिवानी जंगम यांनी पाच वर्षात खालापूरचा विकास केला आहे. त्यामुळे १०० टक्के मतदार शेकापक्षाच्या मागे उभे आहेत.

तसेच कुठलाही विकास सहा महिन्यात होत नसतो. मात्र तरीही विकासकामे झालीच नाहीत, अशी बोंब मारणाऱ्या विरोधकांना सुज्ञ खालापुरकर शेकापला भरभरून मतदान करून चोख उत्तर देतील असा पलटवार किशोर पाटील यांनी केला. खालापूरची जनता विकासाच्या सोबत राहील, कुणाच्याही भूलथापांना बळी पडणार नसल्यामुळे शेकापक्षाची सत्ता येईल असा विश्वासही किशोर पाटील यांनी व्यक्त केला आहे.

खालापुरातील विकासकामांचा अजेंठा पोहोचविण्यासाठी शेकापक्षाचे जिल्हासहचिटणीस किशोर पाटील, तालुका चिटणीस संदीप पाटील, खोपोली शहर चिटणीस अविनाश तावडे, मधुकर शिंदे वाडयावस्त्यावर फिरत असल्याचे छायाचित्रात दिसत आहेत. (छायाचित्र : संतोषी म्हात्रे)

शेकाप-राष्ट्रवादी आघाडीच्या प्रचाराचा धडाका

। पाली/बेणसे । वार्ताहर ।

पालीत नगरपंचायत निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहचला असून खा. सुनिल तटकरे यांची शेकाप-राष्ट्रवादी आघाडीच्या उमेदवारांसाठी धडाकेबाज सभा पार पाडली.

खासदार सुनिल तटकरे म्हणाले की राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते वसंतराव ओसवाल यांची विकासात्मक दूरदृष्टी व्यापक आहे. त्यांनी पाली गावाच्या वाढत्या लोकसंख्येचा विचार करून पाणी साठवण टाक्या निर्माणासाठी विशेष पुढाकार घेतला, हे कौतुकास्पद आहे. सुधागड तालुक्यात सर्वाधिक विकासकामे, लोककल्याणकारी योजना राष्ट्रवादी व शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून झाल्या आहेत, असे खा. तटकरे यांनी ठणकावून सांगितले.

यावेळी माजी आ. धैर्यशील पाटील म्हणाले की, पाली नगरपंचायतीच्या माध्यमातून आपण आधुनिकतेकडे मार्गक्रमण करतोय. पाली शहराच्या सर्वांगीण व सर्वंकष विकासासाठी जनतेने गुणांकण पाहून विकासदृष्टी व चांगला आचार विचार असलेल्या उमेदवारांच्या हातात नगरपंचायतीची सत्ता द्यावी व आपणास अपेक्षित विकास घडवून आणावा असे आवाहन पाटील यांनी केले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते वसंतराव ओसवाल, शेकाप नेते सुरेश खैरे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जिल्हाध्यक्ष गीता पालरेचा, राष्ट्रवादी सुधागड तालुका अध्यक्ष रमेश साळुंके, ग.रा. म्हात्रे, माजी सभापती साक्षी दिघे, राष्ट्रवादी सुधागड तालुका महिला अध्यक्षा रुपाली भणगे, शहर अध्यक्ष अभिजीत चांदोरकर, पंचायत समिती सदस्य सविता हंबीर आदींसह शेकाप व राष्ट्रवादी आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कर्जत शहरात भरदिवसा घरफोडी

४ लाख किंमतीचे दागिने लंपास

। नेरळ । वार्ताहर ।

कर्जत शहरात भरदिवसा घरफोडी करुन दागिन्यांची चोरी करण्यात आल्याची घटना घडली आहे. ही घटना शहरातील नागरीकरण झालेल्या मुद्रे भागातील नानामास्तर नगर परिसरात घडली असून, याप्रकरणी कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, कर्जत शहरातील मौजे मुद्रे भागातील नानामास्तर नगर परिसरात विजय हॉरिजन ही इमारत आहे. या इमारतीत केदार खोडागळे यांचे कुटुंब पहिल्या मजल्यावर राहते. त्यांच्या पत्नी करुणा खोडागळे या पलीकडे

असलेल्या इमारतीत राहणाऱ्या नातेवाईकांकडे काही कामासाठी गेल्या होत्या.

दुपारी दीड वाजता घरातून निघालेल्या करुणा दुपारी चार वाजता घरी परतल्या. तेंव्हा त्यांच्या घराची लोखंडी दरवाज्याला लावलेले लोखंडी कुलूप तुटलेल्या अवस्थेत होते. त्यामुळे त्यांनी घरात जाऊन पाहणी केली असता घरातील बेडरूममधील लाकडी कपाटात ठेवलेला स्टीलचा डब्बा गायब होता. या डब्ब्यांमध्ये सोन्या-चांदीचे दागिने असून, याची ऐवजाची एकूण किंमत ४ लाख ८३ हजार इतकी आहे. याप्रकरणी दाखल तक्रारीनुसार अज्ञातांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास कर्जत पोलीस ठाण्याच्या निरीक्षक सुवर्णा पत्की यांच्या मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक एस.एम.सोनवणे करित आहेत.

साखळी उपोषणाला उद्योजकांचा पाठिंबा

। चिपळूण । प्रतिनिधी ।

चिपळूण बचाव समितीला आता पाठींबा दिला नाहीतर भविष्य अंधारमय असल्याचे सांगून सर्वांनी उत्स्फूर्त सहभागी होण्याचे आवाहन चिपळूणमधील उद्योजक प्रकाशराव दादासाहेब देशमुख यांनी केले आहे. चिपळूण बचाव समितीमार्फत आयोजित करण्यात आलेल्या साखळी उपोषणाच्या चौदाव्या दिवशी चिपळूणमधील यशस्वी उद्योजक प्रकाशराव दादासाहेब देशमुख यांनी आंदोलनस्थळी भेट दिली आहे. या आंदोलनास पाठिंबा दर्शविताना गाळ काढणे हा प्रश्न कुठल्याही राजकीय पक्षाचा नसून प्रत्येक नागरिकांच्या अस्तित्वाचा आहे. असे ते म्हणाले.

महिला कायदेविषयक मार्गदर्शन कार्यक्रम

। अलिबाग । वार्ताहर ।

माणगांव शिक्षण प्रसारक मंडळाचे द.ग.तटकरे महाविद्यालय, माणगांव महिला विकास कक्ष आणि अशोकदादा साबळे विधी महाविद्यालय माणगांव यांच्या संयुक्त विद्यमाने विधी महाविद्यालयातील मुटकोर्ट येथे महिला कायदेविषयक मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाचे आयोजन द.ग.तटकरे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.एम. खामकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

महाविद्यालयाच्या महिला विकास कक्षप्रमुख प्रा. संगिता उतेकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा न्यायाधिश प्रिया बनकर तसेच ॲड. सदफ येलूकर यांचेसह प्रा. अमरिन अडकर, अशोकदादा साबळे विधी महाविद्यालय प्राचार्या ॲड. शमापरविन फारूकी, उपप्राचार्या ॲड. सना फातीमाथुल तसेच महिला विकास कक्षातील सर्व सदस्य उपस्थित होते.

याप्रसंगी प्रिया बनकर यांनी आपल्या मार्गदर्शनात स्त्रियांना वडीलोपार्जीत संपत्तीत समान हक्क, कायदयामध्ये होणारे बदल, स्त्रियांच्या आत्महत्या, घटस्फोटानंतर मिळणारी पोटगी व त्यासंदर्भातील फायदे व कायदे कोणते यासंदर्भात माहिती दिली. तसेच मुलींची छेड काढली, तर कशाप्रकारे कारवाई होवू शकते, हे सांगितले तसेच सामाजिक कायदे, गुन्हेगारी कायदे तसेच विविध कायद्यांविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. सफा ठानगे तर आभारप्रदर्शन ॲड. शमापरविन फारूकी यांनी केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. मेहरीन डावरे, प्रा. वृषाली सालस्कर, प्रा.अमिना राऊत, प्रा. पूजा साखरे, प्रा. युगंधरा मेथा, प्रा. सबरिन लोखंडे, प्रा.सुमय्या अनसारी यांनी विशेष मेहनत घेतली.

कल्याण परिमंडलात ५०३ वीजचोरांना कारवाईचा दणका

विषेश पथकांच्या तपासणीत १ कोटी २९ लाखांची वीजचोरी उघड

। कल्याण । वृत्तसंस्था ।

महावितरणाच्या कल्याण परिमंडल विशेष पथकाने नुकताच केलेल्या शोध मोहिमेत ३ हजार ७१८ वीज जोडण्यांची तपासणी केली असून, यामध्ये तब्बल ५०३ वीज चोरट्यांना कारवाईचा दणका देत १ कोटी २९ लाख रुपयांची वीजचोरी उघडकीस आणली आहे.

याप्रकरणी संबंधितांवर फौजदारी व दंडात्मक कारवाईची प्रक्रिया सुरू असून, आतापर्यंत १८ लाख रुपये वसूल करण्यात आले आहेत.

कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता धनंजय औंढेकर यांच्या मार्गदर्शनाखाली व अधिक्षक अभियंते दीपक पाटील, दिलीप

भोळे, राजेशसिंग चव्हाण, किरण नागावकर यांच्या नेतृत्वाखाली महिला कर्मचारी, पोलिस, सुरक्षारक्षक, जनमित्र, कर्मचारी यांचा समावेश असलेल्या विशेष पथकांकडून ही धडक मोहीम राबवण्यात आली.

तपासणी करण्यात आलेल्या एकूण वीज जोडण्यांपैकी १३.४७ टक्के जोडण्यांमध्ये मीटरशी छेडछाड अथवा थेट मीटर बायपास करून वीजचोरी झाल्याचे निदर्शनास आले. संबंधित ५०१ ग्राहकांवर वीज कायदा २००३ च्या कलम १३५ नुसार कारवाई सुरू आहे. तर अनधिकृत वीजवापर आढळलेल्या १७० जणांवर कलम १२६ अन्वये कारवाई करण्यात येत आहे.

कल्याण पूर्व आणि पश्चिम विभागातील पारनाका, वाडेघर, उंबर्डे, नेतीवली, हाजीमलंग, नांदिवली, शीळ, सोनारपाडा भागात १८२ ठिकाणी ४३ लाख २४ हजार रुपयांची (२ लाख ४३ हजार युनिट) वीजचोरी आढळून आली. उल्हासनगर व कल्याण ग्रामीण विभागातील अंबरनाथ पश्चिम, लालचक्की, तानाजी नगर, इंदिरा नगर, बुवापाडा, खुंटवली, व्हिनस चौक, सेक्शन-२५, कुला कॅम्प, गोवेली, कोन, मांजर्ली, फर्डेपाडा, धसई, शहापूरच्या ग्रामीण परिसरात ८५ जणांकडे २४ लाख ९४ हजार रुपयांची (१ लाख ७१ हजार युनिट) वीजचोरी सापडली. तसेच वसई विभागात वलिव, कोल्ही, गोखिवरे, नायगाव, उमेलमन तर विरार विभागात बाजार वार्ड, फुलपाडा, मानवेलपाडा, चंदनसार, बरफपाडा भागात ४१ लाख २० हजार रुपयांची (२ लाख ५९ हजार युनिट) वीजचोरी उघड झाली. तर पालघर विभागात बोईसर शहराचा काही भाग, नांदगाव, चिंचणी, वानगाव, सरावली, देलवाडी, दांडी परिसरात १९ लाख ५२ हजार रुपयांच्या (२ लाख ३० हजार युनिट) वीजचोरीचा पर्दाफाश करण्यात विशेष पथकाना यश आले.

पान १ वरुन

शिवसेनेतील कदम -परब वाद चिघळला

शिवसेना नेते रामदास कदम यांनी केला आहे.मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. माजी मंत्री आणि शिवसेनेचे नेते रामदास कदम पक्षाला 'जय महाराष्ट्र' करणार असल्याची चर्चा आहे. यासाठी त्यांनी पत्रकार परिषद घेतली.

परब यांचा शिवसेना राष्ट्रवादीत घालण्याचा डाव आहे, असा आरोप त्यांनी केला. रामदास कदम यांनी पत्रकार परिषद घेऊन त्यांची पक्षांतर्गत होणारी कुचंबणा समोर आणली. अनिल परब यांच्यामुळे कदम यांच्या मुलांनाही नगरपंचायतीसाठी तिकीट डावण्यात आले. परब हेच खरे सेनेतील गद्दार आहेत. आणि ते सेनेच्या मुळावर उठल्याचा आरोप कदम यांनी केला. अनिल परब रत्नागिरीचे पालकमंत्र असले तरी ते जिल्ह्यात कधीही फिरकत नाहीत. फक्त झेंडावंदनाला हजेरी लावतात. त्यामुळे जिल्ह्यात काय चाललंय, याची त्यांनी जाणीव नाही. रत्नागिरीतील शिवसेना राष्ट्रवादीच्या घशात घालण्याचा त्यांचा डाव असल्याचे कदम म्हणाले.

'सहकार क्षेत्रात राजकारण नको'

विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस, केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील आणि भाजप नेते राधाकृष्ण विखे-पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. आपण सर्वांनी राजकारण बाजूला ठेवून काम केलं पाहिजे, असे सांगतानाच माझ्याकडे समस्या आल्यास सहकार कोण चालवते, ते पाहणार नाही. युनिट कसे चालले आहे हे पाहीन. राज्य सरकारनेही तेच पाहावे, असे शहा म्हणाले.

महत्त्वाचे

रसायनीत गावठी हातभट्टीवर कारवाई

। रसायनी । वार्ताहर ।

रसायनी पोलिस ठाण्याच्या हद्दीत शुक्रवारी रसायनी पोलिसांनी गैरफायदा गावठी हातभट्यांवर विविध तीन ठिकाणी धाडी टाकून गावठी दारुची हातभट्टी उद्ध्वस्त केली. यात सारसई डोंगराळ भागात सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज गुंड, पोलीस नाईक विशाल झावरे यांनी छापा टाकून बेवारस स्थितीत २०० लिटर रसायन मिळून आले, ते जागीच ओतून व पत्र्याची टाकी तोडून नुकसान केले आहे. तसेच वाशिवली डोंगराळ भागात हातभट्टीची तयार दारु करण्याच्या वेगवेगळ्या दोन ठिकाणी छापा टाकून बेवारस स्थितीत मिळून आलेले १४०० लिटर रसायन जागीच ओतून सहा प्लास्टिकचे ड्रम जाळून नष्ट केले व पत्र्याच्या टाक्या तोडून नुकसान केले आहे. या केलेल्या कारवाईमुळे येथील हातभट्टी व्यवसायिकांची धाबे दणाणले आहेत.

गुरे चोरीमुळे शेतकरी चिंताग्रस्त

। पाताळगंगा । वार्ताहर ।

गेल्या काही वर्षात गुरे चोरीला जाण्याचे प्रकार वाढले आहेत. गुरे गोठ्यात बांधून ठेवलेली चोरून घेऊन जात असतात. तर चरण्यासाठी सोडलेली गुरे चोरुन नेली जात आहे. यामुळे शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. वसंत बेंडू फाटे यांच्या गोठ्यात बांधलेली बैल, गाय आणि कालवड पहाटे तीन च्या सुमारास चोरीला गेल्याचा प्रकार चौक जवळ असलेल्या कोपरी गावात घडला आहे. गाई, बैल तसेच म्हैस यांचा शेतीच्या कामासाठी मोठा उपयोग होत असतो. शेती व्यवसाय करणारे वसंत फाटे यांच्या चोरीला गेलेल्या गुरांमध्ये एक गाय गाभाण असल्याचे समजते. यासंदर्भात चौक येथिल पोलीस स्टेशनमध्ये गुरे चोरीला गेल्याची तक्रार सुद्धा करण्यात आली असल्याचे वसंत फाटे यांच्या मुलाने सांगितले.

पालीत आघाडीच्या प्रचाराचा झंझावत

शेकाप-राष्ट्रवादी जनतेला न्याय देणारी आघाडी : आरिफ मणियार

। पाली/बेणसे । वार्ताहर ।

शेतकरी कामगार पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची आघाडी ही फुले, शाहू आंबेडकर विचारधारेची असून ही आघाडी लोकांना न्याय देणारी आहे असे प्रतिपादन प्रभाग क्र. ४ चे उमेदवार आरिफ मणियार यांनी केले.

पाली नगरपंचायत निवडणुकीची रणधुमाळी जोरात सुरू आहे. निवडणुकीच्या प्रसार प्रचार प्रक्रियेत आजी माजी आमदार, खासदार, मंत्रीगण सहभागी झाल्याने निवडणुकीची रंगत वाढली आहे. या प्रचार प्रसार रॅलीत दस्तरखुद्द राज्यमंत्री

तथा पालकमंत्री आदिती तटकरे, आ.निकेत तटकरे, माजी आ.धैर्यशील पाटील व खा.सुनिल तटकरे हे देखील प्रचार रॅली व सभेद्वारे आघाडीच्या उमेदवारांना विजयी करण्यासाठी प्रचारात सहभागी झाल्याने कार्यकर्ते व उमेदवार यांच्यात प्रचंड उत्साह निर्माण झाला आहे.

बल्लाळेश्वर हे तीर्थक्षेत्र असून भाविकांना पाली शहरात येण्यास अडथळा निर्माण होऊ नये याकरिता बाह्यवळण रस्ता तयार करून वाहतूक कोंडी कमी करणार असल्याचेही आरिफ मणियार यांनी म्हटले आहे. अष्टविनायक तिर्थक्षेत्रांपैकी धार्मिक स्थळ असलेल्या पाली नगरपंचायतीच्या अत्यंत प्रतिष्ठेच्या व राजकीय भवितव्य ठरविणाऱ्या निवडणुकीसाठी सर्वच राजकीय पक्ष नेतेमंडळींनी कंबर कसली आहे.

तळा शहरात अवैध धंदे उघडकीस

पोलिसांनी टाकलेल्या धाडीत गांजा जप्त

। तळा । वार्ताहर ।

तळा शहरातील सुरू असलेले अवैध धंदे पुन्हा उघडकीस आले आहेत. शुक्रवारी रात्री पोलिसांनी टाकलेल्या धाडीत सुमारे १८ हजार रुपयांचा गांजा जप्त करण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की शहरातील परीट आळी येथील आरोपी भरत भिकू तळकर हा गांजा या अमली पदार्थाची छुप्या पद्धतीने विक्री करीत असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार शुक्रवारी रात्री पोलिसांनी सापळा रचून भरत तळकर याच्या घरावर धाड टाकली असता घटनास्थळी पोलिसांना १,५०० ग्रॅम वजनाचा अवैध गांजा एका गुलाबी रंगाच्या कापडी पिशवीमध्ये ठेवलेला आढळून आला. यातील आरोपी भरत तळकर याला पोलिसांनी अटक केली असून पुढील तपास पोलीस निरीक्षक गोविंद ओमासे हे करीत आहेत.

■ नागोठणे श्री साई मित्र मंडळ रामनगर तर्फे साई बाबांच्या प्रतिष्ठापनेचा २० वा वर्धापन दिन व नवीन मुर्तीचा पहिला वर्धापन दिन शनिवारी सकाळी साईबाबा दुग्धाभिषक व दुपारी साई भंडारा (महाप्रसाद) व श्री सत्यनारायणाची पुजा करुण आनंदात उत्सव साजरा करताना रामनगर नागोठणे मधील साई सेवक. (छायाचित्र : राजू जोशी)

खोपोली बाजारातून मोटारसायकल चोरी

। अलिबाग । शहर प्रतिनिधी ।

खोपोली बाजारपेठेत फिर्यादी रा.नडोदे गाव यांच्या मालकीची एकूण ३० हजार रुपये किमतीची हिरो होंडा कंपनीची स्पेलंडर प्लस मोटार सायकल क्रं.एम.एच ०६ एव्ही ३६८१ ही अज्ञात इसमाने चोरुन केली आहे. याबाबत खोपोली पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास महिला पोलीस हवालदार सावंत हे करीत आहेत.

कोकण एज्युकेशन सोसायटीचा १०४ वा वर्धापन दिन

। कोर्लई । वार्ताहर ।

शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या कोकण एज्युकेशन सोसायटीचा १०४ वा वर्धापन दिन वि.के.हायस्कूलच्या प्रांगणात उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून शाळा समितीचे सभापती तथा शिक्षक आ.बाळाराम पाटील यांच्या हस्ते संस्थेच्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी विरोधी पक्षनेते तथा शालेय समितीचे सदस्य

प्रीतम म्हात्रे, इंदूबाई वाजेकर इंग्रजी माध्यमाचे सभापती व्ही. सी.म्हात्रे, वि.के.विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य व संकुल प्रमुख पी.बी ठाकूर, संकुलातील सर्व मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक व शिक्षकेतर बंधू-भगिनी उपस्थित होते.

१८ डिसेंबर १९२४ रोजी संस्थेने थोर शिक्षणकार डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्ण यांच्या हस्ते आपला रौप्य महोत्सव साजरा केला त्याची आठवण म्हणून आजही १८ डिसेंबर हा दिवस संस्थेचा वर्धापन दिन म्हणून साजरा करण्यात येतो.

तळामध्ये राष्ट्रवादीची शिवसेनेवर टीका

। तळा । वार्ताहर ।

तळा शहरातील सत्ताधारी जनतेला वेठीस धरत आहेत. त्यामुळे नगरपंचायत निवडणुकीत एकदा माझ्या हातात सत्ता देऊन बघा, तळा शहरातील २० वर्षांचा रखडलेला विकास भरून काढीन असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस खा.सुनील तटकरे यांनी तळा नगरपंचायत निवडणूक राष्ट्रवादी काँग्रेस उमेदवारांच्या जाहीर प्रचार सभेत व्यक्त केला. यावेळी त्यांनी शिवसेनेवर टीकेची झोड उठविली.

आज ग्रामीण भागात असे कुठलेही गाव नाही वाडी नाही जिथे रस्त्यांचे जाळे विणलेले नाही. मी जिल्हा परिषद अध्यक्ष असताना तळा शहरासाठी अंबेली येथून पहिली पाणी योजना मंजूर करून

आणली शहराचा विकास करायला अक्कल लागते, ती अक्कल आणि नियोजन सत्ताधारी शिवसेनेकडे नाही. आज ज्यांना शहर माहीत नाही ते प्रचार करण्यासाठी आले होते अशी बोचरी टीका उद्योग मंत्री ना.सुभाष देसाई यांचे नाव न घेता तटकरे यांनी केली.

चंद्रकांत रोडे यांनी सत्ताधारी शिवसेनेवर टीकेची झोड उठवत शिवसेनेच्या नाकर्तेपणामुळे तळा शहराची वाट लागली असल्याचे सांगितले. स्थानिक पुढारी केवळ ठेकेदारीतून मलिदा कसा मिळत असेल यावर लक्ष ठेऊन आहेत. पाण्याची गंभीर नियोजन असल्याने शहर सोडून लोक दुसऱ्या शहरात स्थलांतरित झाली आहेत तळा शहराचा विकास करायचा असेल तर राष्ट्रवादी काँग्रेसला संधी असे आवाहन त्यांनी सर्व मतदारांना केले.

माथेरानमध्ये नैसर्गिक जलस्तोत्र होणार खुले

। नेरळ । प्रतिनिधी ।

माथेरान या पर्यटनस्थळी आलेले पर्यटक बाटलीबंद पाणी पिण्यासाठी आग्रही असतात. त्यामुळे आगामी काळात माथेरान पालिकेचे बाटलीबंद पाणी पर्यटकांना उपलब्ध होणार असून त्यासाठी राज्य सरकारने नैसर्गिक झऱ्यांना पुर्नजीवन देण्याच्या माथेरान गिरिस्थान नगरपरिषदेच्या या प्रस्तावित प्रकल्पाला हिरवा कंदील दाखवला आहे. तर माथेरान पालिकेच्या अन्य चार प्रकल्पांना राज्य सरकारच्या नगरविकास विभागाने खा.श्रीरंग बारणे यांच्या पत्रानंतर पाच कोटींचा निधी देण्याची घोषणा राज्याचे नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे.

पालिका बनविणार मिनरल वॉटर

राज्य सरकारचा हिरवा कंदील

माथेरान मध्ये येणाऱ्या पर्यटकांना सतत बाटलीबंद पाणी पिण्याची आवश्यकता असते, हे लक्षात घेऊन माथेरानच्या जंगलात असलेले नैसर्गिक झरे जिवंत करण्याची आणि त्या पाण्यावर प्रक्रिया करण्याचा माथेरान पालिकेचा प्रयत्न राहिला आहे. आता शासनाने त्या वैशिष्ट्यपूर्ण प्रस्तावाला दोन कोटींचा निधी मंजूर केला आहे. शहरात भविष्यात बाहेरून मिनरल बॉटल आणावी लागणार नाही.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

■ WORK FROM HOME ९५०३०५८६२४
■ ॲडव्हान्स लेव्हल शेअर मार्केट कोर्स-Investomax कामत आळी अलिबाग ७७४४०८८४०४
■ अलिबाग येथील रिसॉर्टमध्ये कामासाठी मुले-मुली माणसे पाहिजेत phone -7058476281 / 9323152990 Email-csskshirishkar@gmail.com
■ झिराड येथे बिल्डिंग मटेरिअल व हार्डवेअर कामासाठी मुली पाहिजेत (6000 to 7500) Mob- 8007893232/8007993232.
■ CRYPTO CURRANCY मध्ये रोबोटीक ट्रेडिंग करुन तुमच्या गुंतवणुकीवर ५% ते २५% परतावा मिळवा. मो.: ८००७९८९४१९, ८९८३०९५५६४
■ विवाह पुर्नविवाह सर्वजातीय-आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा-गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
■ दुकान गाळा भाड्याने देणे आहे. अलिबाग एसटी स्टॅण्ड जवळ ९७६४५४८६७९
■ अलिबागमध्ये घरकाम करण्याकरीता मुलगी पाहिजे. शक्यता राहणारी पाहिजे. मो. ८१४९८६५६२५
■ श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग
■ जागा विकणे आहे. अबीटघर, बोर्लीमांडला, तालुका मुरुड (काशिदपासून १२ कि.मी.) येथे ३१ गुंठा जागा विकणे आहे. संपर्क : ९८१९२३०२१७/९०२२७९९७१७
■ कामोठे (नवी मुंबई) येथे कामासह २ वर्षाच्या मुलाला सांभाळण्यासाठी ५० वर्ष वयोगटातील (२४ तास) बाई हवी आहे. आमचा कायमचा पत्ता- विद्यानगर (अलिबाग) मो.नं. ९०२८५२४१४७.
■ अलिबाग चेंढरे येथे एन.ए.जागा विकणे आहे. मो.९०७५०८५९०१

जाहिरातीसाठी संपर्क
☎ (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

कर्जतमध्ये दत्त जयंती साजरी

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील श्री दत्त मंदिरात शनिवारी (दि.१८) दत्त जयंतीच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात कार्यक्रमांचे आयोजन केले होते. भक्तांनी दत्त जयंतीनिमित्त तालुक्यातील दत्त मंदिरात गर्दी केली होती. नेरळ येथील गुरुदत्त मंदिरात अखंड ज्ञानयद् सोहळा आयोजित करण्यात आला होता.

तालुक्यातील वाकस येथील श्री गणेश मंदिरात दत्त जयंती सोहळा आयोजित करण्यात आला होता. नेरळ पासून परिसरातील ३० हुन अधिक गावातील भक्तांनी या मंदिरात जाऊन दत्त जयंतीनिमित्त श्री दत्ताच्या मूर्तीचे दर्शन घेतले.

आयोजक रोहिदास मोरे यांच्याकडून सर्व भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन केले होते. नेरळ गावातील चिंचआळी येथील श्रीगुरुदत्त मंदिरात अखंड नामयद्र सोहळा आयोजीत केला होता. तेथे आज नेरळ गावातील भक्तांनी श्री दत्तांच्या मूर्तीचे दर्शन घेण्यासाठी गर्दी केली होती.

तंबाखू सापडल्याने आरोपीस अटक

। अलिबाग । शहर प्रतिनिधी ।

रसायनी पोलीस ठाणे हद्दीत मौजे तळेगाववाडी येथे एका इसमाकडून गुटखा व तंबाखूचा साठा जप्त करण्या आला आहे. राज्यात गुटखा, पानमसाला, तंबाखू असे पदार्थाची निर्मीती, साठवण, वितरण किंवा विक्रीसाठी प्रतिबंध लागु केलेला असताना देखील हा माल आरोपीच्या ताब्यात मिळुन आला. सदर गुन्ह्यातील आरोपीस शनिवारी (दि. १८) रोजी अटक करण्यात आली आहे. याबाबत रसायनी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस सब इन्सपेक्टर वायंगणकर हे करीत आहेत.

दहीवली परिसरात कचऱ्याचे साम्राज्य

नगरपरिषद आरोग्य विभागाचे दुर्लक्ष

। कर्जत । प्रतिनिधी ।

कर्जत नगरपरिषद क्षेत्रातील दहीवली परिसरात कचऱ्याचे साम्राज्य पसरले आहे. याकडे कर्जत नगरपरिषदेचे आरोग्य विभाग दुर्लक्ष करीत आहे. अशी पोस्ट नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष राजेश लाड यांनी सोशल मीडियावर टाकून नगरपरिषदेसह कर्जतकरांचे लक्ष वेधून घेतले आहे.

कर्जत मधील कोंढणे टाईम्स या व्हॉट्सआप ग्रुपवर माजी नगराध्यक्ष राजेश लाड यांनी दहीवली परिसरातील असणाऱ्या पुलाखालील नाल्याचे रूपांतर कचराकुंडीमध्ये झाले आहे. तसेच रस्त्याच्या साईडपट्टीचे गवत साफ नाही, नीट गटारे साफसफाई करत नाही, कोणी याबाबत ठोस पाऊले उचलतील का ? कर्जत नगरपरिषदेचे स्वच्छता विभाग या साऱ्या भयानक गोष्टींकडे लक्ष देईल का ? असा प्रश्न सोशल मिडीयाद्वारे त्यांनी उपस्थित केला आहे.

अलिबाग विद्यानगरमध्ये बंगला विकणे
G+2, carpet area 3400 sqft builtup on 3000 sqft open land, separate compound, Marble flooring
4 नारळ, 2 आंबा,
1 चिकू, 1 पेरु, 1 सुपारी झाड.
Ideal for गेस्ट हाऊस/ Lodge, Shirt Factory, Residence for Top Executive साठी सोयीस्कर.
संपर्क : 9975490164

नवीन वर्षाच्या स्वागतावर कोरोनाचे सावट

नियमांचा भंग केल्यास कारवाई करणार - तहसीलदार सचिन गोसावी

। दिघी । प्रतिनिधी ।

गेल्या दोन वर्षाच्या कालावधीत आपण सर्वांनीच कोरोनाचा अतिशय सक्षमपणे प्रतिकार केला आहे. नवीन वर्षाचे स्वागत करत असताना नियमांचा भंग करणाऱ्या व्यक्ती विरोधात प्रशासकीय कारवाई केली जाईल असे प्रतिपादन श्रीवर्धनचे तहसीलदार सचिन गोसावी यांनी केले आहे.

तालुक्यात विविध प्रशासकीय यंत्रणेतील कार्यरत असणाऱ्या अधिकारी वर्गाना तहसीलदार यांनी मार्गदर्शन केले. यावेळी गोसावी म्हणाले, कोरोना अजून पूर्णतः संपलेला नाही. अशा प्रसंगी विनाकारण नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींविरोधात प्रशासनाने कारवाई करण्याची सूचना रायगडचे जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्याकडून देण्यात आलेल्या आहेत. श्रीवर्धन तालुक्यात नवीन वर्षाच्या स्वागतासाठी विविध भागातून समुद्रकिनाऱ्यांवर लोकांची गर्दी निदर्शनास येते. गर्दी म्हणजे विनाकारण कोरोनाला दिलेले आमंत्रण आहे. गर्दीमुळे कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव होण्याचा धोका निर्माण होऊ शकतो असे सचिन गोसावी यांनी सांगितले आहे.

> श्रीवर्धन पंचायत समिती प्रशासनाच्या वतीने तालुक्यातील सर्व ग्रामसेवक व ग्रामपंचायत यांना कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर योग्य त्या सूचना दिलेल्या आहेत.
> - उद्धव होळकर गटविकास अधिकारी श्रीवर्धन.

> कोरोना नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींविरोधात पोलीस प्रशासनाकडून तात्काळ कारवाई केली जाईल. समुद्र किनाऱ्यावर होणाऱ्या पार्ट्यांवर पोलिसांची करडी नजर आहे.
> - प्रमोद बाबर, पोलीस निरीक्षक श्रीवर्धन

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अन्नदान हे श्रेष्ठ दान आहे. आपला वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस तसेच आपल्या नातेवाईक-मित्रांच्या स्मृतिदीनी आपण समाजातील तळागाळातील लोकांना अन्नदान करावे असे आवाहन कृषीवल आपणाला करीत आहे. अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दुर्गम भागातील राहणारे आदिवासी, मोलमजुरी करणारे, गोर-गरीब रुग्ण विविध उपचारांसाठी येथे येत असतात. ज्यांच्याकडे येण्या-जाण्याचे देखील पुरेसे पैसे नसतात आणि यात घरातला कमवता पुरुष जर आजारी असेल तर या लोकांची मोठी आर्थिक कुचंबणा होत असते. यासाठी या ट्रस्टच्या वतीने जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. जिल्हा रुग्णालयात फक्त रुग्णांसाठी जेवणाची सरकारी सोय असते, त्यांच्या सोबत रुग्णालयात राहणाऱ्या नातेवाईकांना जेवण मिळत नाही. अशा परिस्थितीत रुग्णाच्या नातेवाईकाला फार कठीण परिस्थितीला तोंड देऊन पोटाची खळगी भरावी लागते किंबहुना काही वेळेला उपासमारीचीही वेळ त्यांच्यावर ओढावते. त्यांच्या या अडीअडचणी लक्षात घेऊन श्री कच्छी जैन भवनने असाह्य रुग्णाच्या एका नातेवाईकाला एक वेळचे पूर्ण जेवण देण्यास सुरुवात केली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते

डॉ. सौ. रेखा व डॉ. श्री. रवींद्र म्हात्रे, २५ व्या लग्नदिनानिमित्त, अलिबाग

महत्त्वाचे

पनवेलमध्ये सापडले अर्भक

। पनवेल । वार्ताहर ।

येथे एका अल्पवयीन मुलीचे अर्भक सापडल्याने परिसरा खळबळ उडाली असून, या मुलीच्या आईवडिलांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. नांदगाव परिसरातील हे अर्भक सापडले असून, याप्रकरणी पनवेलकरांमध्ये अर्भकासाठी हळहळ तर तिच्या मातापित्यांबाबत असंतोष व्यक्त करण्यात येत आहे.पनवेल शहर पोलिसांनी अज्ञात आई वडिलांविरोधात गुन्हा दाखल केला असून या संदर्भात अधिक माहित असल्यास यपनवेल शहर पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन सुद्धा करण्यात आले आहे.

रोहेकरांची पाण्यासाठी वणवण

। रोहा । प्रतिनिधी ।

कुंडलिका नदीकिनारी असलेल्या रोहा शहराचा पाणी पूरवठा तांत्रिक बिघाडामुळे मागील चार दिवसांपासून बंद आहे. यामुळे रोहा शहरातील नागरिकांची पाण्यासाठी वणवण भटकंती सुरू असून, रोह्यातील नागरिक सत्ताधारींच्या नावाने उघडपणे शिमगा करत आहेत.

रोहा शहराला डोलवहाळ येथील धरणातून पाणी पुरवठा करण्यात येतो. १९९७ साली तेरा कोटी रुपयांची योजना रोहा शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी राबविण्यात आली आहे. सदर योजनेच्या माध्यमातून शहरात पाणी पुरवठा होत असला तरी दर

महिन्याच्या १५ व ३० तारखेला जलवाहिनी दुरूस्ती व मेंटेनन्ससाठी मागील दोन वर्षं पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येतो. तरी देखील १५ डिसेंबर रोजी पाणीपुरवठा बंद करून दुरुस्तीचे काम वेळेत पूर्ण झाले नाही. यामुळे १६ तारखेला देखील पाणीपुरवठा होणार नसल्याचे रिक्षा

शहरवासीयांना वॉटर टँकरचा आधार

फिरवून संपूर्ण शहरात सांगण्यात आले. प्रत्यक्षात मात्र १८ तारीख आली, तरी जलवाहिनी दुरुस्तीचे काम संध्याकाळी उशिरापर्यंत पूर्ण झालेले नसल्याने रोहेकर नागरिकांना ऐन थंडीत पाण्यामुळे घामाघूम होण्याची वेळ आली आहे.

नदी संवर्धन प्रकल्प शहराला लागून असलेल्या कुंडलिका नदीवर राबविण्यात आला आहे. पण सदर प्रकल्प राबवत असताना शहरातील सांडपाणी प्रक्रिया न करता थेट नदीत सोडले जात असल्याने नदीच्या पाण्याचा रोहेकर नागरिकांना वापर करता येत नसल्याचे दिसून येत आहे. शहरातील जुन्या बोअरवेल नादुरुस्त झाल्या असून त्यांचा मेंटेनन्स होत नसल्याने नागरिकांना पाण्यासाठी धावाधाव करावी लागत आहे. घरातील सर्व लहान थोर मंडळी पाण्याच्या शोधात वणवण फिरत असून पाणी नसल्याने पाणी पुरवठा करणाऱ्या टँकर चालकांची मात्र चलती झाली आहे.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स
मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

राष्ट्रपुरुषांच्या यादीत संभाजी महाराजांच्या नावाचा समावेश करण्याची मागणी

। रसायनी । वार्ताहर ।

शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या वतीने दरवर्षी राष्ट्रपुरुष थोर व्यक्तीची जयंती व राष्ट्रीय दिन साजरे करण्यासंबंधीची दिनविशेष यादी तयार केली जाते. या यादीमध्ये अद्यापपर्यंत छत्रपती संभाजी महाराजांच्या नावाचा समावेश करण्यात आलेला नाही.

महाराष्ट्र राज्य शासनाने सन २०२२ पासून राष्ट्रपुरुष थोर व्यक्तींच्या जयंती व राष्ट्रीय दिन विशेष यादीमध्ये छत्रपती संभाजी महाराज जयंती १४ मे समाविष्ट करुन मंत्रालय तथा

सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयात छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी करण्याबाबत निर्णय घ्यावा अशी मागणी संभाजी ब्रिगेडसह नागरिकांतून होत आहे.

याबाबत रायगड जिल्हाधिकारी, खालापूर तहसिलदार यांना संभाजी ब्रिगेडच्यावतीने निवेदन देवून तालुकाध्यक्ष स्वप्निल पाटील यांनी मागणी केली आहे.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

-मुख्य संपादक

जाहीर नोटीस

सर्वांना या नोटीसने असे कळविणेत येत आहे की, जिल्हा रायगड, तालुका अलिबाग पैकी मौजे चेंढरे येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत **श्री. प्रदीप राम कोटवानी वगैरे** यांचे मालकीची आहे.

सर्व्हे/गट नंबर	क्षेत्र (हे.आर.)	आकार
५५/२/अ/७	०-०१-९९	१९=९०

सदर मिळकत विद्यमान मालकांकडून आमचे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर व्यवहार पूर्ण करणेपूर्वी सदर मिळकतींमध्ये त्रयस्थ व्यक्तींचा हक्क/काही जडजोखीम असल्यास त्याची माहिती मिळविण्याकरिता ही नोटीस देण्यांत येत आहे.

तरी, सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचा, कोणत्याही प्रकारे हक्कसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

तारीखः १८/१२/२०२१

सही/-
ॲड.संजय माधव आचार्य
मु.पो.चौल
अलिबाग-रायगड

जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मौजे. मापगांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) रिता पानी, २) जयवर्धन घर दिवाण, राहणार-मुंबई यांजकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले असून तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालकांच्या दरम्यान झालेली आहेत व सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा आमच्या अशिलांस विद्यमान मालकांनी दिलेला असून सदर मिळकतीचे मालकी हक्काबाबतचे शोध घेण्याकरिता व त्या मिळकतीची विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातर जमा करण्याकामी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमच्याकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	ग.नं.	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रु. पैसे)
मापगांव	३८	०-१७-९० पो.ख. ०-०१-८० एकुण ०-१९-७०	४.५६

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहीवाटीचे जाणेयेणेचे मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्या मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानीशी हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पुढील ७ (सात) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार यांच्याकडे कळवावी.

येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

कळवे, अलिबाग,
दिनांक : १८/१२/२०२१

सही/-
ॲड. जनार्दन गो. पाटील,
जिल्हा न्यायालय, रायगड.

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
(म्हाडाचा घटक)

MHADA Portal : https://mhada.gov.in

जाहीर सूचना

प्राधिकृत अधिकारी/अपिल अधिकारी यांचेकडील प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याबाबत समाज मंदिर हॉल, वांद्रे (पूर्व), मुंबई येथे दि. २१/१२/२०२१ व दि. २२/१२/२०२१ रोजी विशेष मोहिम राबविण्याबाबत

दिनांक २८/०६/२०१२, दिनांक ०९/०५/२०१६ व दिनांक ०२/१२/२०१६ रोजी काढण्यात आलेल्या सोडतीमधील यशस्वी अर्जदारांना गाळा वितरणाचे प्रथम सुचना पत्र पाठविण्यात आले आहेत. त्यानुसार गिरणी कामगार/वारस यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करुन पात्र/अपात्रतेच्या निर्णयास्तव सदरच्या मुळ नस्ती प्राधिकृत अधिकारी/अपिलीय अधिकारी यांच्या संयुक्त चमूकडे पाठविण्यात आलेल्या आहेत.

तथापि बहुतांश गिरणी कामगार/वारस यांनी सादर केलेली कागदपत्रे हे अपुरे असल्याने संबंधित प्राधिकृत अधिकारी/अपिलीय अधिकारी यांनी आपणांस वेळोवेळी आवश्यक असणारी कागदपत्रे सादर करण्याबाबत कळविलेले आहे. तसेच स्मरणपत्र सुद्धा पाठविण्यात आलेले आहेत. परंतु विविध कालावधीत आवश्यक असणारी कागदपत्रे सादर न केल्याने पात्र/अपात्र बाबतचा निर्णय प्रलंबित आहे.

उपरोक्त सोडतीमधील प्राधिकृत अधिकारी/अपिल अधिकारी यांचेकडील प्रलंबित असणारी प्रकरणे तात्काळ निकाली काढण्यासाठी **दिनांक २१/१२/२०२१ व दिनांक २२/१२/२०२१** रोजी वेळ **सकाळी १०.०० ते ०५.०० वाजता समाज मंदिर हॉल, वांद्रे (पूर्व), मुंबई** येथे विशेष मोहिम आयोजित करण्यात आलेली आहे. तरी ज्या गिरणी कामगारांची पात्रता निश्चिती कागदपत्र सादर करण्याच्या अभावी बाकी आहे, अशा गिरणी कामगार/वारसांची यादी म्हाडाचे संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदर यादीमध्ये नमूद केल्याप्रमाणे आयोजित केलेल्या शिबिरामध्ये आवश्यक त्या कागदपत्रासह वर नमूद दिनांक व वेळी व्यक्तिशः ओळखपत्रासह उपस्थित राहावे.

सही/-
(डॉ. योगेश म्हसे)
मुख्य अधिकारी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई

टिप : कोविड-१९ या विषाणूच्या प्रादुर्भावामुळे शासनाने वेळोवेळी घातलेल्या नियमांचे पालन करावे.

CPRO/A/462

परवडणाऱ्या गृहनिर्मितीची देशातील सर्वात मोठी यंत्रणा - *म्हाडा*

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे, सुरेखार, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक कै.राधाबाई मारूती पेढवी यांचे वारस जनार्दन मारूती पेढवी, अशोक मारूती पेढवी, अच्युत मारुती पेढवी, दिलीप मारुती पेढवी, प्रदीप मारुती पेढवी, राजश्री राजाराम वेटकोळी, आश्वीनी अशोक उशिरकर, यांचे सोबत व्यवहाराची बोलणी चालू आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	गट नं.	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रु.पै.)
सुरेखार, ता.अलिबाग	४४	०-१९-६० पो.ख. ०-००-०० एकूण ०-१९-६०	२.५०

वर नमुद मिळकत सदर नोटीसीचा विषय आहे.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण,दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन,चार्ज पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहित लेखी स्वरूपात आणून द्यावत. मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही.

ठिकाण-अलिबाग
दिनांकः १८/१२/२०२१

सही/-
ॲड.राहूल रमेश नाईक
मु.चिंचपागल्ली, पो.नागांव,
ता.अलिबाग, जि.रायगड
मोबा.क्र.९९२२७९८५२८

स्वयंपाकच्या पाइपलाईनद्वारे गॅसचे उद्घाटन

। पनवेल । वार्ताहर ।

खारघर सेक्टर ३५ मध्ये पाईपलाईनद्वारे घरगुती स्वयंपाकाच्या गॅसचे उद्घाटन खारघर तळोजा कॉलनीज वेल्फेअर असोसिएशनने सातत्याने अधिकाऱ्याकडे केलेल्या पाठपुराव्याचे फळ मिळाले आहे.

केशव रेसिडेन्सी सेक्टर ३५ खारघर येथे महानगर गॅसच्या वतीने प्रत्येक फ्लॅटमध्ये पाइपलाइनद्वारे रहिवाशांसाठी महानगर गॅस कनेक्शनचे उद्घाटन खारघर तळोजा कॅल वेलफेअर असोसिएशनचे मंगेश रानवडे यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

ज्या सोसायट्या, रहिवासी पाइपलाइन कनेक्शन सुरू करू इच्छितात, त्यांनी महानगर गॅसशी समन्वय साधण्यासाठी खारघर तळोजा कॉलनीज वेलफेअर असोसिएशनशी संपर्क साधू शकता. केशव रेसिडेन्सीमधील अन्सारी कुटुंबाने ही नवीन सुविधा यशस्वीपणे सुरू केल्याबद्दल आणि महानगर गॅसचे आभार मानले या उद्घाटनावेळी महानगर गॅसची संपूर्ण टीम आणि केशव रेसिडेन्सीची व्यवस्थापन समितीची टीम उपस्थित होती.

जासईत 'अल्पसंख्यांक हक्क दिन' साजरा

। जेएनपीटी । वार्ताहर ।

रयत शिक्षण संस्थेचे श्रीछत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा.पाटील ज्युनिअर कॉलेज, जासई या विद्यालयात अल्पसंख्यांक हक्क दिवस साजरा करण्यात आला.

अल्पसंख्याक नागरिकांना त्यांची संस्कृती, भाषा, धर्म आणि परंपरा यांचे संवर्धन करता यावे म्हणून राज्य घटनेने जे अधिकार दिले त्यांची माहीती उपस्थित विद्यार्थ्यांना दिली.

या प्रसंगी विद्यालयाचे अरुण घाग यांनीही आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांना अल्पसंख्यांकांना त्यांच्या घटनात्मक आणि कायदेशीर हक्कांबाबत जाणीव करून दिली.

यावेळी विद्यालयाचे साळुंखे आर. एस.व सर्व सेवक वर्ग आणि विद्यार्थी उपस्थित होते. तसेच यशवंत घरत, सुभाष घरत, बाळा पाटील इत्यादी शिक्षणप्रेमी नागरिक उपस्थित होते.

मराठी शाळेस स्मार्ट टिव्हीची भेट

। मुरुड जंजिरा । वार्ताहर ।

मुरुड तालुक्यातील आगरदांडा येथील रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेस अमेरिका येथील समाजसेविका डॉ. सुरेखा जोशी व समाजसेवक नरेंद्र मोरे यांच्याकडून शाळेतील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञान्याचे शिक्षण मिळावे व जागतिक स्पर्धेत मराठी शाळेतील मुले मागे राहू नयेत व दर्जेदार शिक्षण प्राप्त करण्यासाठी ३० हजार किमतीचा स्मार्ट टीव्ही शाळेस भेट देण्यात आला आहे. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मानसी चिंदरकर सिद्धी हेदुलकर, विनया पाटील, अपर्णा भाटकर, प्रवीण भाटकर, सुशांती मयेकर, सुरेश कणसे, राजेश जाधव, आदी मान्यवर उपस्थित होते.

मोहोपाडा येथे श्री दत्त जयंती साजरी

। रसायनी । प्रतिनिधी ।

मोहोपाडा व शिवनगर ग्रामस्थांचे बाजारपेठेत असणाऱ्या श्रीदत्तमंदिरात श्रीदत्तजयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन साध्या पध्दतीने करण्यात आले होते.

यावेळी परिसरातील महिला वर्गाने समान वेश परिधान केला होता. यानंतर सकाळी श्री दत्तमूर्ती अभिषेक व पुजेचा मान गावचे यजमान पत्रकार राकेश खराडे व रसिका खराडे यांच्याहस्ते पार पडला. यानंतर ग्रामस्थांच्यावतीने ज्ञानेश्वरी पारायण होवून श्रीदत्त प्रासादिक भजन मंडळाचा संगीत भजनाचा कार्यक्रम झाला. श्री दत्तमंदिर मिरवणूकीत काढण्यात आली असून, यामध्ये या मिोहोपाडा ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दत्तजयंती पारंपरिक भिक्षा फेरी साधेपणाने

। कोर्लई । वार्ताहर ।

मुरुड तालुक्यातील मजगांवमध्ये १५५ वर्षांपासून पारंपरिक पद्धतीने साजरी करण्यात येणाऱ्या दत्तजयंती उत्सवावर कोरोना ओमोक्रॉनचे सावट असून, सकाळची भिक्षाफेरी अत्यंत साधेपणाने काढण्यात आली होती.

मजगांव परीसरातील भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या श्रीदत्तमंदिरात यंदा कोरोना रोगाच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या अटी नियम व शर्तीचे पालन करीत ओम् मल्हारी दत्त देवस्थानचे ट्रस्टी महेश गोसावी यांच्या हस्ते श्रीमुर्तीची विधिवत पुजा-अर्चा व अभिषेक करण्यात आला. दरवर्षी प्रमाणे होणारी भिक्षेची फेरी अत्यंत साधेपणाने काढण्यात आली होती.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. रविंद विश्वनाथ पाटील यांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत श्री. तानाजी हरीभाऊ बिबवे यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे-जांमरुंग, ता.कर्जत, जि.रायगड येथील मिळकत.

सर्व्हे नं./हिस्सा नं.	क्षेत्रफळ हे.आर.पाँ.	आकार रु.पै.
१४८/१०/ब	०-३३-००	०-२८

वरीलप्रमाणे मिळकत त्यामधील तदंगभुत सर्वहक्कहितसंबध यासुद्धा.

तरी सदर मिळकतीत अथवा सदर मिळकतीच्या कोणत्याही भागावर कोणत्याही व्यक्तीचा अथवा संस्थेचा गहाण, दान, बक्षीस, खरेदी, साठेकरार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती आणि त्यांच्या हरकती नमुद केलेल्या हक्कांबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या मुदतीत प्रत्यक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहित आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

दिनांकः १८/१२/२०२१
ठिकाणः कर्जत

ॲड.मिनाक्षी जगन्नाथ भासे
पत्ता- शॉप नं.१६, श्री.नेमीनाथ हाईटस्,
मुद्रे (बुद्रक), ता.कर्जत, जि.रायगड ४१० २०१
मो.नं.७४१०१४८१२१/७७९८१५११८८

मोहोपाडा येथे श्री दत्त जयंती साजरी

। रसायनी । प्रतिनिधी ।

मोहोपाडा व शिवनगर ग्रामस्थांचे बाजारपेठेत असणाऱ्या श्रीदत्तमंदिरात श्रीदत्तजयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन साध्या पध्दतीने करण्यात आले होते.

यावेळी परिसरातील महिला वर्गाने समान वेश परिधान केला होता. यानंतर सकाळी श्री दत्तमूर्ती अभिषेक व पुजेचा मान गावचे यजमान पत्रकार राकेश खराडे व रसिका खराडे यांच्याहस्ते पार पडला. यानंतर ग्रामस्थांच्यावतीने ज्ञानेश्वरी पारायण होवून श्रीदत्त प्रासादिक भजन मंडळाचा संगीत भजनाचा कार्यक्रम झाला. श्री दत्तमंदिर मिरवणूकीत काढण्यात आली असून, यामध्ये या मिोहोपाडा ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ग्रुप ग्रामपंचायत कापडे बु.।। ता. पोलादपूर, जि.रायगड

निविदा सूचना

ग्रुप ग्रामपंचायत कापडे बु.।।, ता. पोलादपूर, जि.रायगड अ.जाती व नवबौद्ध घटकाच्या वस्तीचा विकास करणे योजनेतील खालील कामांकरिता नोंदणीकृत/अनुभवी अधिकृत ठेकेदारांकडून निविदा मागविणेत येत आहेत. कोणत्याही कारणास्तव कोणतीही निविदा नामंजूर करणेचा अधिकार मा.सरपंच यांनी राखून ठेवला आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकिय रक्कम	काम पूर्ण करणेचा कालावधी	निविदा सादर करणेची अंतिम तारीख व वेळ
१	कापडे सिद्धार्थ नगर रस्ता व संरक्षण भिंत बांधणे	५०००००	१ महिना	२४/१२/२०२१ सायं ५ वाजेपर्यंत

अटी व शर्ती:-

१. कामाचे अंदाजपत्रक व आराखडा कार्यालयीन वेळेत पाहावयास मिळेल व फी भरून त्याची प्रत मिळेल.
२. नियमानुसार सुरक्षा अनामत व विविध कर बिलातून कपात केले जातील.
३. कामाचा दोष निवारण कालावधी काम पूर्ण झालेपासून सहा महिन्यांपर्यंत राहील.
४. रीतसर उपरोक्त व अन्य अटी शर्तीबाबत/निधीनुसार करारनामा करून कार्यारंभ आदेश दिले जातील.

सही/-
ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत कापडे बु.।।

सही/-
सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत कापडे बु.।।

अलिबाग येथील मे.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर सो. यांचे कोर्टात

दिवाणी चौकशी अर्ज क्र.१०१/२०२१

श्री. अशोक गोपाळ पाटील वगैरे -----**अर्जदार**
विरुद्ध

कोणीही नाही .....सामनेवाला

या जाहिर नोटीशीने तमाम जनतेस कळविण्यात येते की,

प्रस्तुत अर्जदार नं.१ ते ४ यांचे वडील कै.गोपाळ नागू पाटील दिनांक ४/११/१९८३ रोजी मयत झाले आहे. कै.गोपाळ नागू पाटील यांच्या पश्चात त्यांना अर्जदार १)श्री.अशोक गोपाळ पाटील, २)श्री राजा गोपाळ पाटील, ३) श्री. संतोष गोपाळ पाटील ४) श्री. अरूण गोपाळ पाटील हे कायदेशीर वारस आहेत.

अर्जदार नं.१ ते ४ हे वारस असल्याबाबतचा वारसादाखला मिळणेकामी या मे.कोर्टात अर्जदार यांनी अर्ज दाखल केलेला आहे.

सदर अर्जाबाबत कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्यांनी दि.१३/०१/२२ रोजी सकाळी ११.०० वाजता मे.कोर्टापुढे सर्व पुराव्यानिशी स्वतः किंवा वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे मांडावे.

सदरहू मुदतीत जर सदरच्या अर्जास कुणाचीही कसलीही हरकत आली नाही तर मे.कोर्ट अर्जदारांच्या अर्जावर योग्य तो हुकूम करून अर्जदार नं.१ ते ४ यांना कायद्याने यांचा वारसदाखला देणेकामी मे.न्यायालय योग्य ते आदेश करेल याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक १४/१२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्यानिशी दिली.

सही/-
कनिष्ठ लिपीक
सि.ज.सि.डी.

कोर्टाचा शिक्का

सही/-
कनिष्ठ लिपीक
सि.ज.सि.डी.

महत्त्वाचे

आज आपटा येथे रक्तदान शिबीर

आपटा : वृषभ धुमाळ युवा प्रतिष्ठानच्या वतीने तथा सद्गुरू चॅरिटेबल ट्रस्ट कोपरखैरणे यांच्या विशेष संयोजनातून आपटा येथे रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. राधाकृष्ण मंदिरात दि.१९ डिसें. रोजी स.१० ते दु.४ या वेळेत हे शिबीर संपन्न होणार असून, यामध्ये अधिकाधिक रक्तदात्यांनी सहभाग नोंदवून रक्तदान करण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

कोरोना संरक्षक कीटचे वाटप

नवी मुंबई : महाराष्ट्र सामाजिक विकास ट्रस्ट, पेण जि.रायगड यांच्यावतीने कोकण विभागीय माहिती कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना संस्थेचे अध्यक्ष मनोज गावंड यांच्या हस्ते कोरोना संरक्षक कीटचे वाटप करण्यात आले. या कीटमध्ये रबरी हात मोजे, मास्क, सॅनिटायझर, साबन या वस्तूंचा समावेश आहे. याप्रसंगी कोकण विभागाचे माहिती उपसंचालक डॉ.गणेश मुळे, प्रविण डोंगरदिवे, वनिता कांबळे, गंगाराम बांगारा, राम गोंदके, प्रशांत गावंड, राजश्री वाडेकर आदि उपस्थित होते. सामाजिक संस्थांनी कोरोना काळात केलेल्या उत्तम कार्याबद्दल उपसंचालक डॉ. गणेश मुळे यांनी आभार व्यक्त केले आहेत.

सायराबानू चौगुले याचे सुयश

माणगाव : बोधी ट्री एज्युकेशनल फाऊंडेशन तथा जीवन गौरव सार्वजनिक वाचनालय यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय निबंधलेखन स्पर्धेचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला असून, या स्पर्धेत माणगावच्या रहिवासी तथा रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, विंचवलीच्या शिक्षिका सायराबानू चौगुले यांनी उत्तेजनाथ यश मिळवले आहे.

वणव्यांमुळे जिल्ह्यातील वनसंपदेवर आघात

पशूपक्ष्यांसह आदिवासींचा अधिवासही धोक्यात

। सुधागड-पाली । वार्ताहर ।

नैसर्गिकरित्या किंवा मानवांच्या करणीमुळे जिल्ह्यातील जंगल परिसरात लागलेल्या आगीच्या घटना काही नवीन नाहीत. मात्र मानवी हव्यास, सातत्याने बदलणारे ऋतुमान अशा विविध कारणांमूळे जंगल परिसरात लागणाऱ्या वणव्यांचे प्रमाण वाढत जात असून, परिणामी जिल्ह्यातील वनसंपदेवर आघात वारंवार आघात होत आहेत.

या विनाशकारी घटनांमुळे वनातील पशूपक्षी तसेच अन्य सजीवांसह आदिवासी समाजाचाही आदिवास धोक्यात येत आहे. यामुळे जैवविविधता धोक्यात येत असून, प्रसंगी रायगड जिल्हा निसर्गराजीने सजलेला प्रदेश अशी आपली ओळख गमावून बसेल. याच अनुषंगाने निसर्गप्रेमी तथा अन्य सेवाभावी संस्थांकडून ठोस उपाय योजनांची आवश्यकता करण्याची मागणी करण्यात येत आहे.

महाराष्ट्रातील पश्चिम घाटाच्या पूर्वेकडील चिंचोळा भाग म्हणजे कोकण. यातच रायगड जिल्ह्याला नैसर्गिक, ऐतिहासिक, धार्मिक, आधुनिक असा संमिश्र वारसा लाभला आहे. मात्र, दिवसागणिक नैसर्गिक आणि ऐतिहासिक वारसा वणव्यांमुळे धोक्यात येत आहे.

काही दिवसांपूर्वी माणगाव तालुक्यातील विळे भागाड एमआयडीसी भागातील डोंगरावर व माळरानावर प्रचंड मोठा वणवा लागला होता. येथील स्थानिक पर्यावरण व निसर्ग अभ्यासक राम मुंढे यांनी या भागाची पाहणी केली असता या वनव्यामध्ये ठिपकेवाली मुनिया आणि इतर पक्षांची घरटी पूर्णपणे जळून गेली आहेत. शिवाय पूर्ण विकसित झालेली अंडी देखील जळाली आहेत. अशाच प्रकारचे वणवे ठिकठिकाणी लागणे सुरू झाले आहे.

पालीतील सरसगड किल्ल्यावर मागील वर्षी तब्बल ६ वेळा वणवा लागला होता. यामध्ये नव्याने लावलेले रोपे व वृक्ष जळून खाक झाली होती. शिवाय येथील माकडे, वानरे व पक्ष्यांच्या अन्नाचा प्रश्न निर्माण झाला. या घटनेत त्यांचा अधिवास देखील नष्ट झाला.

पावसाळ्यात जिल्ह्यातील डोंगर, माळरान, गड-किल्ले या सर्व ठिकाणी मोठ्या प्रमाणात खुरटे गवत आणि झुडपे उगवतात. ऑक्टोबरनंतर वाढत्या उष्म्याने ही झुडपे व गवत सुकतात. आणि अशा माळरान, डोंगर परिसरात सुकेल्या खुरट्या गवताना आणि झुडपांना नैसर्गिकरीत्या वणवा लागतो, तर काही लोक कळत-नकळत आग लावतात. या आगीचे रुपांतर प्रचंड नैसर्गिक व कृत्रिम वणव्यात होते. आणि परिणामी वनसंपदेवर आघात होतो.

दरवर्षी जिल्ह्यात हजारो हेक्टर क्षेत्रावर असे वणवे लागल्याच्या नोंदी आहेत. या आगीत झाडे-झुडपे, पशू-पक्षी, सूक्ष्मजीव तसेच सरपटणारे प्राणी यांचा जळून मृत्यु होवून सजीवसृष्टीवर त्याचा विपरीत परिणाम होत आहे. जिल्ह्यातील विविध ऐतिहासिक वास्तू आणि किल्ल्यांवरील हे वणवे या ऐतिहासिक वास्तूंना देखील नुकसान पोहचवत आहेत. सध्या अशा वनव्यांना मोठ्या प्रमाणात सुरुवात झाली असल्याचे चित्र जिल्ह्यात विविध ठिकाणी पहायला मिळत आहे.

यातील बहुतांश वणवे हे मानवनिर्मित असतात. नोव्हेंबर अखेरपासून व मार्चनंतर पानगळ सुरू झाल्यावर या दोन वेळा जिल्ह्यात वणवे लागत. यावेळी पक्षांचा विणीचा हंगाम असतो. त्यामुळे पक्षी, त्यांचा अधिवास, त्यांची पिल्ले आणि अंडी नष्ट होतात. तसेच वणव्यामुळे महत्वाची जैवविविधता धोक्यात येते. या वणव्यांवर नियंत्रण आणणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच वनविभागाने ही बाब गंभीरतेने घेवून तत्काळ उपायोजना करणे आवश्यक आहे.

> **पशूपक्षी, कीटक, रानफुले, मृदा आदींना प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या वणव्याची झळ बसते. वणवे रोखण्यासाठी वन विभागाकडून जनजागृती व प्रबोधन केले जाते. फायर ब्लोअरद्वारे वणवे विझविले जातात. जळरेषा काढली जाते.**
> **– समीर शिंदे, वनक्षेत्रपाल, कांदळवन, अलिबाग**

वीजचोरी प्रकरणी वाशी मंडळाची धडक कारवाई

। कल्याण । वृत्तसंस्था ।

महावितरण मंडळाकडून पनवेल विभागात उच्चदाब ग्राहक मे. ऑस्कर इन्फ्रा या स्टोन क्रशरच्या मीटरचा एमआरआय अहवालची चाचणी केली असता, या चाचणीमध्ये अनियमितता आढळून आली व जून २०२१ पासून कमी नोंद होत असल्याचे दिसून आले.

याप्रकरणी कंपनीचे मालक जियाउद्दीन इक्बाल पटेल यांची १ कोटी २९ लाख १६ हजार रुपयेची ७,२३,६९८ केव्हीएच युनिटची वीजचोरी वाशी मंडळाने उघडकीस आणली असून, या उद्योजकाविरुद्ध पनवेल शहर पोलीस ठाण्यात वीजचोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या कारवाई दरम्यान, स्टोन क्रशर कंपनीचे मालक जियाउद्दीन इक्बाल पटेल व त्यांचे दोन भागीदार रफिउद्दिन इकबाल पटेल व खालिद इकबाल पटेल या तिघांवर मे २०२१ ते ९ डिसेंबर २०२१ या कालावधीत ५,९४,७११ केव्हीएच युनिटची रु. १ कोटी १५ लाख, ८७ हजार ९९९ ची वीजचोरी केल्याचा गुन्हा नोंदवला आहे. ही वीजचोरी उघड करण्यात वाशी मंडळाच्या चाचणी विभागाने विशेष मेहनत घेतली असून मुख्य अभियंता भांडूप परिमंडल सुरेश गणेशकर यांनी संबंधित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले आहे.

याशिवाय, वीजचोरी करणे एक असामाजिक कृत्य आणि गुन्हादेखील आहे. तेव्हा ग्राहकांनी या कृत्यांपासून दूर राहावे. ग्राहक वीजचोरी करित असल्याचे आढळ्यास असाच गुन्हा दाखल करण्यात येईल. यामध्ये ग्राहकास रोख दंडाशिवाय अटक सुद्धा होऊ शकते. म्हणून प्रामाणिकपणे विजेचा वापर करुन वापरलेल्या विजेचे पैसे भरावे असे आवाहन भांडूप परिमंडलचे मुख्य अभियंता सुरेश गणेशकर यांनी केले आहे.

महिलांसाठी प्रशिक्षण शिबीर

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

मुरुड नगरपरिषदेच्या महिला व बाल कल्याण समिती अंतर्गत महिलांना करिता दुग्धजन्य पदार्थ तयार करणे व ऍडव्हान्स ज्वेलरी मेकिंग या दोन प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरामध्ये ५० महिला लाभार्थीनी आपला सहभाग नोंदविला. या शिबिरास महिला व बालकल्याण समिती सभापती आरती गुरव, सायली धुमाळ, प्रशिक्षक रेश्मा सय्यद, पर्यटन व नियोजन समिती सभापती युगा ठाकुर, नगरसेविका अनुजा दांडेकर, आरोग्य अधिकारी राकेश पाटील, नैनिता कर्णिक आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी नगरपरिषदेमार्फत देण्यात आलेल्या या प्रशिक्षणाचा उपयोग महिलांना त्यांच्या पुढील आयुष्यामध्ये स्वावलंबी होण्यासाठी मदत करेल, असा विश्वास नैनिता कर्णिक यांनी व्यक्त केला आहे.

प्रधान मंत्री फसल बिमा योजना
रायगड जिल्ह्यासह इतर जिल्ह्यांमध्ये अंमलबजावणी

। अलिबाग । शहर प्रतिनिधी ।

बळीराजाच्या आधारासाठी केंद्र शासनाने सुरु केलेली प्रधान मंत्री फसल बिमा योजना (पीएमएफबीवाय) रायगड जिल्ह्यासह महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांमध्ये अंमलात आणली जाणार आहे.

या योजनेसंदर्भात प्रत्येक राज्यशासन दुवा पातळीवर काम पाहणार असून, राज्यशासनाच्या वतीने महाराष्ट्रात एचडीएफसी एर्गो जनरल इन्शुरन्स कंपनी या भारतातील खासगी क्षेत्रातील नॉन-लाइफ विमा पुरवणाऱ्या कंपनीद्वारे पीएमएफबीवाय कार्यान्वित केली जाणार आहे. यानुसार रायगड, धुळे, पुणे, औरंगाबाद, हिंगोली, अकोला आणि भंडारा या जिल्ह्यांतील कर्ज घेतलेल्या तसेच कर्ज न घेतलेल्या शेतकऱ्यांना २०२१-२२ च्या रबी हंगामासाठी ही योजना पुरविण्यात

येणार आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये तांदुळ या पिकासाठी विमाकृत राशी ५०००० रुपये इतकी असून, शेतकऱ्यांसाठी हफ्ता ७५० रुपये तर भुईमूग या पिकासाठी विमाकृत राशी ४०००० रुपये इतकी असून, शेतकऱ्यांसाठी हफ्ता ६०० रुपये आहे. तसेच ऑनलाईन अर्ज दाखल करण्यासाठी ३१ मार्च २०२२ ही अंतिम मुदत निर्धारीत करण्यात आली आहे.

या योजनेअंतर्गत दुष्काळ, पूर, कोरडेगवत, भूस्खलन, चक्रीवादळ, गारपीट, महापूर, कीटक, रोग आणि इतर यांसारख्या व्यापक धोक्यांमुळे पीक उत्पादनामध्ये होणाऱ्या नुकसानासाठी शेतकऱ्यांना विमा पुरविला जातो. महत्त्वाचे म्हणजे ही योजना लागवडपूर्व, लागवडीदरम्यान व लागवडीनंतर अशा पीक चक्राच्या सर्व टप्प्यांमध्ये होणाऱ्या नुकसानांसाठी विमा संरक्षण प्रदान करते.

या योजनेअंतर्गत विमा संरक्षण मिळवण्यासाठी त्यांच्या जिल्ह्यांमधील संबंधित बँका, कॉमन सर्विस सेंटर्स (सीएससी) यांच्याकडे जाऊ शकतात किंवा अधिकृत एचडीएफसी एर्गो एजंट्सशी संपर्क साधू शकतात. विमा संरक्षण मिळवण्यासाठी वैधता कालावधीची सविस्तर माहिती शेतकऱ्यांसाठी कृषी विभागाच्या वेबसाइटवर उपलब्ध असेल.

एचडीएफसी एर्गो आणि कंपनी ऑफर करत असलेली उत्पादने व सेवांबाबत अधिक माहितीसाठी www.hdfcergo.com या संकेत स्थळावर माहिती उपलब्ध आहे.

साप्ताहिक राशिभविष्य : दि. १९ ते २५ डिसेंबर २०२१

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

प्रयत्नांना यश मिळेल

मेष : मेषराशीधारकांनी आपले या सप्ताहातील आपले ग्रह आपल्याला साथ देणारे ठरणार आहे. आपण जे प्रयत्न कराल, त्यात यश मिळणार आहे. मोठे यश मिळाले नाही तरी लहान लहान यशाने आपण काही कालावधीत शिखरावर पोहचलेले दिसाल. नवीन गोष्टी बाबत बाह् करू नका हळूहळू सर्व आपल्या अंगवळणी पडणार आहे. अनामिक भीती कमी होईल. शुभत्व वाढेल. ग्रहांचे परिणाम जाणवतील. व्यापार-उद्योगातील गडबड, गोंधळ कमी होईल. कारखानदारी, मोठे उद्योग आता रुळावर येतील. त्यासाठी कर्मचारी वर्गाचा मोठा वाटा असेल. नोकरीतील परिस्थिती समाधानकारक राहील. त्यामुळे कामावर लक्ष केंद्रित होईल. रोजच्या रोज ठरलेले कामाचे परतावे चांगले राहतील. अनेक अडचणींवर मात कराल. तुमची चिकाटी तुमचे यश पूर्णत्वाला नेईल. आर्थिकदृष्ट्या परिपक्वता येईल. राजकीय क्षेत्रात विकासाच्या दृष्टीने वाटचाल चालू राहील. भाऊबंदकी व शेजारीपाजारी यांच्याशी मात्र दोन हात लांबच राहा. **महिलावर्ग :** तुमच्यातील सकारात्मक बदल घरातील सर्वांनाच आनंद देणारा ठरेल. उपासनेत मन रमवावे. शारीरिक समतोल उत्तम राखण्यात यश मिळेल. **शुभ दिनांक :** २०,२५.

प्रकृतीकडे लक्ष द्यावे

सिंह : सिंहराशीसाठी या सप्ताहाच्या चंद्राचे भ्रमण होत असताना त्याचा परिणाम या राशीवर होणार आहे. तेव्हा मानसिकदृष्ट्या हतबल न होता प्रकृतीची काळजी घ्या. मानसिक दडपण घेऊन कोणतेही कार्य सिद्ध होत नाही हे लक्षात घ्या. व्यवसायात सध्या तरी नको ते धाडस वाढवू नका. चालू घडी सुरळीत ठेवण्याचा प्रयत्न करा. निर्थक गोष्टीत वेळ न दवडता ठरावीक काळापुरताच विचार करणे सोयीचे ठरेल. इतरांची मदत घेताना काळजी घ्या. नोकरदार व्यक्तीला प्रामाणिकपणे केलेल्या कामाचे फळ चांगले मिळेल. आर्थिक बाबतीतील चढ-उतार लक्षात घेऊन पाऊल टाका. सार्वजनिक क्षेत्रातील उत्साह टिकवून ठेवा. कुटुंबाला विश्वासात घेऊन तुमच्या कामाच्या नियोजनाची कल्पना द्या. वैवाहिक जोडीदाराच्या भावनेची कदर करा. दुखणे अंगावर काढत बसू नका. योग्य वेळी उपचार घ्या. **महिलावर्ग :** हाती घेतलेली कामे पार पाडू शकाल. कलाक्षेत्राला उत्तम प्रतिसाद मिळेल. विशेषतः महिलावर्गाला त्यांच्या कला क्षेत्रात अधिक वाव मिळेल. मानसिक संतुलन ठेवा. विचारपूर्वक कृती करा. यामुळे फायदा झाला नाही तरी नुकसान होणार नाही. **शुभदिनांक :** १९,२२.

परिस्थितीनुसार वागावे

धनु : धनुराशीसाठी या सप्ताहात अशुभ गोष्टींचे परिणाम कमी झालेले जाणवू लागतील. वर्तमान परिस्थितीचा अंदाज घ्या. त्यानुसार नियमावली ठरवा. खरेदी-विक्रीच्या व्यवहारातील नेहमीची सवय बदलावी लागेल. व्यापार-उद्योगाच्या दृष्टीने रोखीच्या व्यवहाराला महत्त्व द्या. दक्षतापूर्वक घेतलेली काळजी हिताची ठरेल. कामाच्या ठिकाणी ठरवलेले नियम स्वीकारून पुढे चला. आक्रमक भूमिका घेऊ नका. शक्य तेवढे कामाकडे लक्ष द्या. द्विधा मनःस्थिती टाळा. महत्त्वाचे निर्णय पुढे ढकला. आर्थिक बाबतीत जेवढ्यास तेवढे राहा. नेहमीपेक्षा खर्चाचे प्रमाण कमी करा. राजकीय धुरा सांभाळताना नाकी नऊ येणार नाही, याची सुरक्षितता बाळगा. स्वतः न पाहिलेल्या गोष्टींवर विश्वास ठेवू नका. घरगुती वातावरणातील पेच हळूवारपणे सांभाळा. धार्मिक गोष्टीतील प्रसन्नता वाढेल. खाण्यातील अभिरुची वाढलेली असेल. प्रकृती साथ देईल. **महिलावर्ग :** प्रकृतीस्वास्थ्य जपा. विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. कोर्टाच्या कामांना गती मिळेल. दूरच्या आप्तेष्टांच्या संपर्कात राहाल त्यांच्यामुळे आपला मोठा लाभ संभवतो. **शुभदिनांक :** २०,२४.

तणाव घेणे टाळावे

वृषभ : वृषभराशीसाठी या सप्ताहातील ग्रहमानाप्रमाणे शुभ ग्रहांची ताकद वाढेल. उत्साह निर्माण होईल. व्यापारी क्षेत्रातील व्याप वाढता राहील. नावीन्यपूर्ण गोष्टी उदयास येतील. हाताबाहेरच्या गोष्टी आवाक्यात राहतील. व्यवसायातील संभ्रमित स्थिती बदलेल. नोकरदार व्यक्तीने प्रत्येक दिवस मोजत राहणे टाळा. तणावमुक्त राहा. कामावर लक्ष द्या. हेवेदावे बाजूला ठेवा. नोकरीतील सध्याचा सूर लक्षात घ्या. नेमक्या गोष्टी करण्याचा आढावा घ्या. शक्य तितक्या लवकर परिस्थिती स्वीकारण्याचा प्रयत्न करा. पैशांच्या बाबतीत जमेची बाजू राहील. राजकीय क्षेत्रात विजय संपादन कराल. घरातील ज्येष्ठ व्यक्तींच्या आवडीनिवडीचा विचार करा. जोडीदारासमवेत असलेला अबोला मिटेल. नात्यातील स्नेह वाढेल. धार्मिक गोष्टीतून समाधान मिळेल. मनाची एकाग्रता वाढेल. प्रकृती ठणठणीत राहील. **महिलावर्ग :** पाऊल सावकाश टाका. वित्तीय गोष्टींमध्ये तुम्हाला काही संघर्ष करावे लागू शकतात आणि दुसरीकडे खर्चात वृद्धी होईल, धन संबंधित गुंतवणूक विचारपूर्वक करा. **शुभ दिनांक :** २१,२३.

बोलण्यावर नियंत्रण ठेवा

कन्या : कन्याराशीसाठी आपले ग्रहमान पाहता या आठवड्यात आपण आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवून वागल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येणे शक्य होईल. आपल्या बोलण्याने इतरांचा 'इगो' दुखावणार नाही, याची दक्षता घ्या. भविष्याचा विचार न करता वर्तमानकाळाचा आनंद घेऊन सुखी-समाधानी राहण्याचा प्रयत्न करा. सरकारी नियम व कायद्याचे पालन कटाक्षाने पाळा. सरकारी देणी त्वरित भरा. भक्तिमार्गाचा अवलंब केल्यास आनंद मिळू शकेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. प्रकृतीस्वास्थ्य जपा. विशेषतः मोसमी आजारापासून सावध राहा. जोडीदाराची अपेक्षित साथ मिळेल. राशिस्थानी मंगळाचे वास्तव्य असल्याने कामाचा उत्साह वृद्धिंगत होईल. पण त्याचबरोबर आपल्या रागावर योग्य नियंत्रण ठेवा. जेणेकरून इतरांची नाराजी होणार नाही, याकडे लक्ष द्या. **महिलावर्ग :** तुम्हाला तुमच्या जवळच्या लोकांपासून लांब जावे लागू शकते. तुमच्या कुटुंबात काही शुभ कार्य होण्याची ही शक्यता आहे. विद्यार्थ्यांना चांगल्या गुणांची प्राप्ती होईल कौटुंबिक वातावरण चांगले राहील. **शुभदिनांक :** २०,२३.

जपून पावले टाका

मकर : मकरराशीसाठी या सप्ताहात आपण अखेर अडथळ्यांची शर्यत शेवटी पार केली, असेच म्हणावे लागेल. आपल्या राशीला उत्तुंग भरारी मिळवण्याचे स्वप्न प्रत्यक्षात साकार होण्याच्या मार्ग समोर दिसणार आहे. मात्र हुरळून जाऊन काम विघडवू नका. सध्या ग्रहयोगाची अनुकूलता वाढलेली असेल. व्यापारातील जाणकार व्यक्तींकडून मार्गदर्शन घ्या. हाती घेतलेल्या कामाचे नियोजन निश्चित करा. निरंतर परिश्रमाचे ठसे उमटू लागतील. व्यवहारात फसगत होऊ देऊ नका. सेवक वर्गाने व्यक्तीशः केलेल्या कामाचे स्वरूप हाताळताना काळजी घ्यावी. स्वतंत्र विचारप्रणाली सध्या बाजूला ठेवा. अधिकारी व्यक्तींनी ठरवून दिलेले नियम मोडू नका. पशांच्या बाबतीत उधळण करणे टाळा. सामाजिक माध्यमांचा चुकीच्या कामासाठी उपयोग करू नका. मित्रांना वैयक्तिक गोष्टीत हस्तक्षेप करू देऊ नका. अविवाहितांचा विवाह प्रश्न सुटेल. प्रकृती उत्तम राहील. बोलण्यावर मात्र नियंत्रण ठेवावे म्हणजे गैरसमज होणार नाहीत. **महिलावर्ग :** प्रकृतीस्वास्थ्य जपा. विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा महिलांना त्यांच्या अंगभूत कलागुणांना चांगला वाव मिळेल. **शुभ दिनांकः** २०,२५.

आत्मविश्वास कायम ठेवावा

मिथुन : मिथुनराशीसाठी या सप्ताहाचे तारेवरची कसरत आता संपणारी असली तरी प्रयत्न सोडून चालणार नाही. सतत कष्ट करणे हे मनात ठेवून प्रयत्नवादी राहणे, उत्तम राहील. दोन कामांऐवजी एकाच कामाकडे लक्ष दिले तर निश्चितच नुकसान होणार नाही. चालू क्षेत्रातील व्यवसायाला चिकित्सकपणे आत्मपरीक्षण करणे गरजेचे राहील. खोल विचार करताना वेगवेगळ्या गोष्टींवर नजर फिरवावी लागेल. व्यवसायातील चढ-उतार हे नेहमीप्रमाणेच राहतील. नोकरदार व्यक्तीने स्वतःचा आत्मविश्वास न गमावता ठामपणे उभे राहा. कामातील अडचणी सोडवण्यासाठी जेष्ठांचा सल्ला घ्या. तो आपल्याला अनुभव म्हणून उपयोगी पडेल. मर्यादित खर्च केल्यास कर्जाचा भार थोडा हलका होईल. नवीन कर्जाच्यामागे सध्यातरी लागू नका. मुलांना योग्य समज देण्याची गरज राहील. प्रकृती नरम-गरम असेल. **महिलावर्ग :** भावनिक प्रश्नात अडकू नका. भावनेपेक्षा थोड मेंदूच्याविचाराने कार्य करा. करिअरच्या दृष्टिकोनातून तुम्हाला पद प्राप्ती होऊ शकते. आपल्या मुलांसाठी हा काळ बराच अनुकूल राहील. यश मिळेल. **शुभ दिनांक :** २०,२४

कामे मार्गी लागतील

तूळ : तुलराशीसाठी आपले ग्रहमान अवघड वाट सोपी करण्याचा तुमचा अट्टाहास सिद्ध होईल. ग्रहांचे प्राबल्य उत्तम राहील. व्यावसायिकदृष्ट्या चालून आलेल्या सुवर्णसंधीचा वापर तुम्ही चांगला कराल. काही संस्थांशी केलेले करार मार्गी लागतील. मोठ्या कारखानदारी उद्योग व्यवसायाला खऱ्या अर्थाने चालना मिळेल. छोट्या स्वरूपातील काम आता हळूहळू मोठ्या स्वरूपात होऊ लागेल. कोलमडलेली व्यावसायिक जीवनशैली पुन्हा नव्याने उभी राहील. केलेले नियोजन यशस्वी ठरेल. नोकरीमध्ये ज्या पदासाठी तुम्ही उत्सुक आहात, ते तुमच्याकडे सोपवले जाईल. याचा आनंद तुमच्या चेहऱ्यावर दिसून येईल. आर्थिक निराशा कमी होईल. राजकीय क्षेत्रात तुमच्या बोलण्याचा प्रभाव राहील. या प्रभावाच्या जोरावर आपली बरीच कामे मार्गी लागणार आहेत. थोरामोठ्यांची कृपा राहील. खाण्यापिण्याचे पथ्यपाणी पाळा. आरोग्य जपा. **महिलावर्ग :** महिलावर्गाला त्यांच्या अंगभूत कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. वैवाहिक जोडीदाराची साथ मिळेल. बाहेर फिरायला जाण्याचे स्वप्न यावेळी पूर्ण करू शकाल. मुलांनकडून खुशखबर मिळेल. प्रकृती जपा. **शुभदिनांक :** १९,२५

परिस्थिती बदलण्याचा काळ

कुंभ : कुंभराशीसाठी या सप्ताहात अनावश्यक कामे टाळणे, उत्तम राहील. या आठवड्याची सुरुवात थोडी कंटाळवाणी वाटेल. त्यानंतर मात्र आळस झटकून कामाला लागाल. मागील काही दिवसांपासून इच्छा असून सुद्धा प्रगतीची झेप उंचावत नव्हती. आता मात्र ती परिस्थिती बदलेल. व्यापार-उद्योगाच्या ठिकाणी व्यवहार सुरळीत पार पडतील. नवे काही प्रकल्प हाती येतील. नोकरदार व्यक्तींनी मानसिकदृष्ट्या हतबल न होता कामात लक्ष घाला. इतरांच्या बोलण्याचा विचार न करता अनावश्यक गोष्टी टाळा. महत्त्वाच्या गोष्टींना प्राधान्य द्या. खर्चाची बाजू सावरली तर पैशांची कमतरता जाणवणार नाही. हातात पैसा येत राहील. खर्चावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. सार्वजनिक ठिकाणी नेहमी प्रमाणाचा हातखंडा राहील. **महिलावर्ग :** बोलण्यावर मात्र नियंत्रण ठेवावे, म्हणजे गैरसमज होणार नाहीत. प्रकृतीस्वास्थ्य जपा. विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा महिलांना त्यांच्या अंगभूत कलागुणांना चांगला वाव मिळेल. **शुभ दिनांक-** २०,२५.

विविध समस्या उद्भवतील

कर्क : कर्कराशीधारकास या सप्ताहात तुम्हाला काम आणि आराम यामध्ये संतुलन ठेवण्याची आवश्यकता असेल. कारण, तुम्हाला शारीरिक समस्यांचा सामना करावा लागू शकतो. विशेष रूपात मांसपेशी आणि नसांच्या संबंधित समस्या येऊ शकतात. प्रेम जीवनासाठी वर्ष अनुकूल राहील आणि तुमचे प्रेम जीवन उत्तम होईल. विवाहित व्यक्तींसाठी ह्या सप्ताहाची सुरुवात अधिक चांगली नाही. जोडीदाराच्या क्रोधाला बळी पडण्याची शक्यता आहे. मुलांसाठी हा काळ सामान्य राहील. त्यांचे स्वास्थ्य प्रभावित राहू शकते. आठवड्याचा पूर्वार्ध कौटुंबिक जीवनासाठी अनुकूल नाही आणि आई वडिलांचे आरोग्य ही प्रभावित राहील. परंतु उत्तरार्धात स्थिती बऱ्यापैकी अनुकूल होईल. विद्यार्थ्यांसाठी हा आठवडा अनुकूल असेल आणि त्यांना परदेशातील यूनिवर्सिटीमध्ये ॲडमिशन मिळू शकते. आर्थिक स्थिती काही आव्हानात्मक राहील आणि तुम्हाला बरेच सांभाळून चालावे लागेल. अन्यथा वित्तीय संकटाचा सामना करावा लागू शकतो. **महिलावर्ग :** कामात आपला स्वार्थ न बघता इतरांकडे बघण्याचा दृष्टिकोन ठेवल्यास त्याचा आनंद घेऊ शकाल. आप्तेष्टांच्या संपर्कात राहता येईल आर्थिक बाजू ठीक राहील. कौटुंबिक वातावरण बिघडू देऊ नका. **शुभ दिनांक :** २१,२३

लाभ देणारा सप्ताह

वृश्चिक :- वृश्चिक राशीसाठी आपले हा सप्ताह आपली ग्रहस्थिती खूप सकारात्मक असल्याने होणारे चंद्राचे भ्रमण आपल्याला शुभदायक ठरेल. अडकलेली कामे आता वेगाने सुरू होतील. थोडक्यात लांबलेल्या गोष्टींना वेग येईल. शुभ घटनांचे संकेत मिळतील. आगामी काळासाठी उत्पन्नवाढीचे परिणाम चांगले राहतील. मोठ्या उद्योगधंद्यांना मिळणारी कलाटणी धीर देणारी असेल. देवाणघेवाण वाढल्यामुळे फायद्याचेही प्रमाण वाढलेले असेल. शासकीय कर्मचारी वर्गाला मोठी जबाबदारी पार पाडावी लागेल. ज्येष्ठांकडून तुमच्या कामाचे कौतुक होईल. आर्थिक प्रगती उत्तम राहील. राजकीय क्षेत्रात मानसन्मान मिळेल. मित्रांमार्फत मिळणारी संधी डावलू नका. ओळखीचा फायदा होईल. भाऊबंदकीचा त्रास कमी होईल. नव्या नात्यांमधील वाढ जीवनाला चांगले वळण देणारे ठरेल. वैवाहिकदृष्ट्या सुखद अनुभव मिळेल. मानसिक प्रसन्नता लाभेल. आरोग्य उत्तम राहील. **महिलावर्ग :** वैवाहिक जोडीदाराशी सामंजस्याने वागावे. प्रेमासंबंधी मंडळींना सबुरीचा सल्ला. महिलांना त्यांच्या अंगभूत कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. **शुभ दिनांक :** २१,२५.

आनंददायी घटना घडतील

मीन : मीनराशीसाठी या सप्ताहात आपल्या राशीला ग्रहाचे पाठबळ उत्तम राहील. आपल्या मनात घोळत असलेला संभ्रम कमी होईल. या आठवड्यात बऱ्यापैकी अनुकूलता राहील. सुधारित घटनांना वेग येईल. व्यवसायात आश्चर्यकारक बदल होतील. अनेक धोरणे पार पडतील. केलेल्या गुंतवणुकीचा लाभ चांगला होईल. आतापर्यंत नोकरीवर मिळालेली सुट्टी भरून काढावी लागेल. कामाचे तास वाढवावे लागतील. संशोधनकार्यात सहभागी व्हाल. बौद्धिक यश मिळेल. आर्थिक बाबतीत तत्पर राहा. अनोळखी व्यक्तींवर विश्वास ठेवू नका. सार्वजनिक गोष्टीतील हालचालींकडे लक्ष द्या. मात्र ज्येष्ठ व्यक्तींना दुखावून चालणार नाही. त्यामुळे त्यांच्या बरोबर गोडी वाढवण्याचा प्रयत्न करा. **महिलवर्ग :** एकंदरीत आपल्या नात्यातील गोडवा वाढल्याने घरात आनंदी वातावरण राहील. अविवाहितांचे मनाप्रमाणे विवाह ठरतील तर काही इच्छुकांचे स्वप्न पूर्ण होणार आहे. त्यांनी लॉटरी काढण्यास हरकत नाही खूप वर्षापासून रखडलेले विवाह प्रयत्न केल्यास ठरतील. दैव अनुकूल राहील. तब्येतीत सुधारणा होतील. विचारांचे समीकरण जुळू शकेल. **शुभ दिनांक :** २१,२३.

मोहोर

आज सगळ्यांच्या तोंडी नाव आहे ते हरनाज संधूचं. तब्बल २१ वर्षांनंतर हरनाजने भारताला मिस युनिव्हर्स स्पर्धेत यश मिळवून दिलं. कोणाच्याही ध्यानीमनी नसताना हरनाजने यंदाच्या मिस युनिव्हर्स स्पर्धेचं विजेतेपद पटकावून आश्चर्याचा धक्का दिला. पंजाबमधल्या छोट्याशा गावाच्या हरनाजचा आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या सौंदर्यस्पर्धेपर्यंत पोहोचण्याचा प्रवास थक्क करणारा आहे. जगाला लाभलेल्या या नव्या मिस युनिव्हर्सबद्दल...

देशाचा नाज... हरनाज

गौरव
श्रीशा वागळे

हरनाज संधूने मिस युनिव्हर्स स्पर्धेतल्या सर्वोच्च पदकाचा भारताचा २१ वर्षांचा दुष्काळ संपवला. सध्या सगळीकडेच कोरोना आणि त्यातही ओमायक्रॉनच्या प्रसारामुळे चिंतेचं वातावरण पसरलं असताना हरनाजच्या विजयाच्या वृत्ताने भारतीयांच्या चेहऱ्यावर हसू फुललं. लारा दत्ता ही भारताची अखेरची मिस युनिव्हर्स. १२ मे २००० या दिवशी लाराने हा किताब पटकावला. त्यावेळी हरनाज अवघ्या ५० दिवसांची होती. अवघ्या ५० दिवसांचं हे बाळ २१ वर्षांनी इतिहास घडवेल, असं कदाचित तेव्हा कोणालाही वाटलं नसावं! एकीकडे लाराच्या डोक्यावर मिस युनिव्हर्सचा मुकुट सजत होता तर दुसरीकडे हरनाजच्या रूपात भविष्यातल्या मिस युनिव्हर्सने जन्म घेतला होता.

मिस युनिव्हर्स, मिस वर्ल्ड या स्पर्धा मागील अनेक वर्षांपासून होत असल्या तरी भारतात त्यांना खरी लोकप्रियता मिळवून दिली ती सुश्मीता सेन आणि ऐश्वर्या राय यांनी. या दोघींनी एकाच वर्षात मिस युनिव्हर्स आणि मिस वर्ल्ड किताब पटकावत धमाल उडवून दिली आणि भारतीय सौंदर्याला जागतिक पटलावर अनोखं स्थान मिळालं. १९९४ मध्ये या दोघींनी हा किताब पटकावला तेव्हा भारत एका नव्या स्थित्यंतरातून जात होता. भारताची अर्थव्यवस्था नुकतीच खुली झाली होती. इथल्या तरुणाईला भरारी घेण्याची स्वप्नं पडू लागली होती. क्रिकेटमध्ये सचिन तेंडुलकर नामक युगाचा आरंभ झाला होता. सचिन असंख्य क्रिकेटवेड्या तरुणांचा आदर्श बनला. त्याने सर्वसामान्य घरातल्या मुलांना स्वप्न पहायला शिकवलं. त्याचप्रमाणे सुश्मिता सेन आणि ऐश्वर्या राय यांनी सर्वसामान्य घरातल्या मुलींना ग्लॅमरजगताची स्वप्नं पहायला शिकवलं. दरम्यानच्या काळात युक्ता मुखी, प्रियांका चोप्रा, डायना हेडन आणि मानुषी छिल्लर या भारताच्या सौंदर्यवतींनी मिस वर्ल्ड किताब पटकावला. मिस युनिव्हर्स किताब पटकावणारी हरनाज ही केवळ तिसरी भारतीय सौंदर्यवती. म्हणूनच तिच्या विजयाचं मोल अधिक आहे.

हरनाज कौर ही सर्वसामान्य घरातली तरुणी. तिचा जन्म मुंबई, दिल्ली, बंगळूरूसारख्या महानगरात नाही तर पंजाबमधल्या गुरूदासपूरमधल्या कोहाली या छोट्याशा गावात झाला. कोहाली हे अवघ्या १४०० लोकसंख्येचं गाव. एवढ्या लहानशा गावात जन्म घेतल्यानंतर आज सौंदर्याच्या आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर झळकण्याचा अवर्णनीय आनंद हरनाज अनुभवते आहे. न भूतो, न भविष्यती अशी अनुभूती घेत आहे. वयाच्या अवघ्या २१ व्या वर्षी हरनाजला हे यश मिळालं. इस्रायलमध्ये झालेल्या या सौंदर्य स्पर्धेत तिने ७९ देशांमधल्या सौंदर्यवतींचं आव्हान परतवून लावलं. हरनाज 'पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन' या विषयात मास्टर्स करत असून तिला राजकारणात रस आहे. हरनाजची आई स्त्रीरोगतज्ज्ञ असून वडील व्यावसायिक आहेत. मात्र त्यांनी मुलीवर विशिष्ट क्षेत्रात कारकिर्द घडवण्याचा दबाव टाकला नाही. तिला मोकळेपणाने जगू दिलं. आवडीच्या क्षेत्रात जाऊ दिलं. हरनाज शिक्षण तर घेत आहेच शिवाय मॉडेलिंगच्या क्षेत्रातही तिने नाव कमावलं आहे. हरनाजने काही चित्रपटांमध्येही भूमिका केल्या आहेत. यासोबतच तिने अनेकविध सौंदर्यस्पर्धांची विजेतेपदं पटकावली आहेत. हरनाजने टाईम्स मिस फ्रेश चंडीगढ, मिस मॅक्स इमर्जिंग स्टार, फेमिना मिस इंडिया पंजाब आदी किताब पटकावले असून २०२१ मध्ये ती 'मिस इंडिया' ठरली. तिने यारां दियां पू बारां, बाई जी कुट्टंगे या चित्रपटांमध्ये भूमिका केल्या आहेत. मॉडेलिंग ही आवड असली तरी तिला न्यायाधीश बनायचं आहे आणि त्या दृष्टीने तिची तयारीही सुरू आहे.

मिस इंडिया बनल्यानंतर हरनाजने मिस युनिव्हर्स स्पर्धेसाठी जोरदार तयारी सुरू केली. तिला कुठेच कमी पडायचं नव्हतं. या पंजाबी कुडीला देशाचं नाव पुन्हा एकदा आंतरराष्ट्रीय पटलावर उज्ज्वल करायचं होतं. भारताच्या मुली प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर असल्याचं दाखवून द्यायचं होतं. या स्पर्धेची तयारी करताना तिने योगा आणि मेडिटेशनवर भर दिला. मानसिक आरोग्याची जपणूक हे या स्पर्धेतल्या तिच्या यशाचं महत्त्वाचं कारण ठरलं. हरनाज आपल्या उद्दिष्टापासून कधीही ढळली नाही. मिस इंडिया युनिव्हर्स झाल्यापासूनच तिच्या डोळ्यांसमोर लक्ष्य होतं ते मिस युनिव्हर्स किताबाचं. हा किताब मिळवायचाच असं मनोमन ठरवूनच ती तयारीला लागली होती आणि अखेर या प्रयत्नांना यश आलं. आज हरनाज मिस युनिव्हर्स असली तरी पूर्वायुष्यात तिला दिसण्यावरून, देहयष्टीवरून अनेक टोमणे ऐकावे लागले. खूप बारीक मुलींना बरंच काही ऐकावं लागतं. हरनाजही खूप बारीक होती. पंजाबमध्ये धष्टपुष्ट असण्याला निरोगी मानलं जातं. त्यामुळे हरनाजला कधी काळी काडेपेटीची काडीही म्हटलं गेलं. तिला नेहमीच नकारात्मक प्रतिक्रियांना सामोरं जावं लागलं. वारा वाहत असताना बाहेर पडू नकोस; उडून जाशील, बिचारीला जेवायलाही मिळत नाही वाटतं, अशा असंख्य प्रतिक्रियांची जणू तिला सवयच झाली होती. कितीही दुर्लक्ष करायचं ठरवलं तरी अशा गोष्टी मनाला बोचतातच. माणसाचा स्वत:वरचा विश्वासच उडू लागतो. आपण कुचकामी, काहीच करू शकत नाही, असे विचार मनात यायला लागतात. हरनाजलाही या सगळ्यामुळे काही प्रमाणात नैराश्य आलं होतं. तिचा आत्मविश्वास डळमळीत झाला होता. पण तिने स्वत:ला सावरलं. या अशा नकारात्मक प्रतिक्रियांकडे दुर्लक्ष करायचं ठरवलं.

या सगळ्या प्रवासात हरनाजला आईची साथ मिळाली. आईने हरनाजला नवा आत्मविश्वास मिळवून दिला. कुटुंबही तिच्या पाठीशी खंबीरपणे उभं राहिलं. ती सगळ्यांपेक्षा वेगळी असल्याची जाणीव करून देण्यात आली. मग आपण देवाचं लाडकं मूल असल्याची जाणीव तिला झाली. आज टोमणे मारणारे लोक तिचं नक्कीच कौतुक करत असतील. या सगळ्यातून धडे घेत हरनाज खूप पुढे निघून गेली आहे. आज तिला जागतिक पटलावर ओळख मिळाली आहे. हरनाजचं शालेय शिक्षण चंडीगढम धून झालं. सध्या ती पोस्ट ग्रॅज्युएट गव्हर्न्मेंट गर्ल्स कॉलेजची विद्यार्थिनी आहे. हरनाज अभ्यासातही खूप हुशार होती. तिने कधीही शिकवणी लावली नाही. स्वत:चा अभ्यास स्वत:च केला. पोहणं, घोडेस्वारी, अभिनय, नृत्य आणि फिरायची तिला खूप आवड आहे. मोकळ्या वेळात ती या छंदांना वेळ देते. पंजाबी असल्यामुळे ती पट्टीची खवय्यी आहे. ती सगळं खाते. सोबत फिटनेसही जपते. कितीही व्यस्त असली तरी व्यायामाला सुट्टी देत नाही. मोजकं पण चांगलंचुंगलं खाण्यावर तिचा भर असतो. कोरोनाकाळाने हरनाजला बरंच काही शिकवलं. डॉक्टर असल्यामुळे हरनाजच्या आईला कोरोना ड्युटीवर जावं लागायचं. आई कोरोना योद्धा असल्यामुळे हरनाजने मोकळ्या वेळात घराकडे लक्ष दिलं. टाळेबंदीच्या काळात ती स्वयंपाक शिकली. वेगवेगळे पदार्थ बनवले. खवय्या असणाऱ्या हरनाजला स्वयंपाकही खूप आवडू लागला. पंजाबचं वैशिष्ट्य असणारे मक्के दी रोटी, सरसो का साग आणि लस्सी हे पदार्थ तिला विशेष जमतात.

हरनाज शांत स्वभावाची आहे. तिला पशू-पक्ष्यांची विशेष आवड आहे. मिस युनिव्हर्स किताब मिळाल्याचं कळल्यानंतर तिच्या आईच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले. शांत स्वभावाच्या हरनाजने आज जगाला हादरवून सोडलं, अशी बोलकी प्रतिक्रिया त्यांनी दिली तर तिच्या भावाने आज धाकटी बहीण मोठी झाली, अशी प्रतिक्रिया दिली. हरनाजच्या वडिलांनाही मुलीचा खूप अभिमान वाटतो. 'मिस युनिव्हर्स'चा किताब पटकावताच हरनाजच्या डोळ्यात पाणी आलं. तिने 'चक दे फट्टे' म्हणत विजयाचा हा आनंद साजरा केला. नव्या युगातल्या दबावांचा सामना करण्यासाठी तू युवा महिलांना काय सल्ला देशील, असा प्रश्न तिला विचारण्यात आला होता. खरं तर हरनाजही या प्रश्नाचं नेमकं उत्तर शोधण्याच्या प्रक्रियेतून गेली होती. त्यामुळे ती स्वत:ला या प्रश्नाशी जोडू शकली. ती म्हणाली, आज तरुणांनी स्वत:वर विश्वास ठेवणं आवश्यक आहे आणि हाच त्यांच्यावरचा सर्वात मोठा दबाव आहे. तुम्ही वेगळे आहात, अनोखे आहात ही जाणीव अधिक सुंदर बनवते. इतरांशी स्वत:शी तुलना करणं बंद करा आणि जगात घडणाऱ्या इतर महत्त्वाच्या गोष्टींकडे लक्ष द्या, बाहेर पडा. स्वत:च्या हक्कांसाठी लढा. तुम्हीच तुमच्या आयुष्याचं नेतृत्व करता. तुम्हीच तुमच्यासाठी उभं रहायला हवं. मी आत्मविश्वासाच्या बळावर इथे उभी आहे. तिच्या या उत्तरावर टाळ्यांचा कडकडाट झाला. हरनाजचं हे उत्तर अनेक महिलांना प्रेरणा देऊन जाईल, त्यांच्यात नवा आत्मविश्वास निर्माण करेल, जगण्याची नवी उमेद जागवेल अशी आशा करायला हरकत नाही. हरनाजचं हे यश मोठी स्वप्नं पाहणाऱ्या प्रत्येक मुलीला नवी दिशा दाखवेल.

प्रसाद केरकर
चिंतन
९८६७७२११९०

स्टेट बँक अदाणींच्या दावणीला...

देशातील सर्वात मोठी सरकारी मालकीची असलेली स्टेट बँक ऑफ इंडिया आता देशातील दोन क्रमाकांचे भांडवलदार अदाणी यांच्या दावणीला घालण्याचा घाट घातला जात आहे. केंद्रातील मोदी सरकारने स्टेट बँक ऑफ इंडिया ही खासगी करणार नाही असे मोठे आश्वासन दिले असले तरी या बँकेचा नफा शोषून घेऊन तो खासगी भांडवलदारांकडे कसा वळविला जाईल याचा जणू रोडमॅपच तयार केला जात आहे, असे म्हटल्यास वावगे ठरु नये. अलिकडेच स्टेट बँकेने अदाणींच्या एका वित्तिय कंपनीशी सहकार्य करार केला आहे. या करारानुसार, स्टेट बँकेच्या सर्व कृषी कर्जांचे वितरण या कंपनीच्या मार्फत केले जाणार आहे.

या करारावियी स्टेट बँक व अदाणी समूह या दोघांनीही फारशी कुठे वाच्यता केली नव्हती किंवा त्यासंबंधी अधिकृत प्रसिध्दी पत्रकही जारी केले नव्हते. परंतु ही बातमी अखेर फुटलीच. अदामी समूहाच्या या जेमतेम एक हजार कोटी उलाढाल असलेल्या व ६० शाखा, प्रामुख्याने शहरी भागात असलेल्या या कंपनीशी स्टेट बँकेने सहकार्य करार केल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. स्टेट बँकेच्या या दाव्यानुसार, या सहकार्यामुळे स्टेट बँकेची सेवा ग्रामीण भागात पोहोचण्यास मोठी मदत होणार आहे. स्टेट बँकेचा हा दावा शंभर टक्के फसवा आहे. कारण २५००० शाखांचे जाळे असलेल्या स्टेट बँकेने ६० शाखा व जेमतेम एक हाजार कोटी रुपयांची उलाढाल असलेल्या कंपनीशी सहकार्य करार करणे व त्यामुळे स्टेट बँकेस मोठी मदत होणार असे सांगणे म्हणजे थट्टा केल्यासारखेच आहे. त्यामुळे हा सहकार्य करार करण्यासाठी स्टेट बँकेच्या व्यवस्थापनावर केंद्रातील सरकारकडून दबाव आलेला आहे, ही काळ्या दगडावरची रेख आहे. या सहकार्य कराराच्या माध्यमातून अदानींचा शिरकाव आता स्टेट बँकेत केंद्राने करुन दिला आहे. आता हा उद्योगसमूह देशातील या सर्वात मोठ्या बँकेला पोखरायला सुरुवात करणार आहे. त्यातूनच पुढे कधी स्टेट बँकेचे खासगीकरण करण्याचा घाट घातला जाईल त्यावेळी अदानी ही बँक गिळंकृत करणार हे नक्की आहे. मोदी सरकारने देशातील सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांचे खासगीकरण करण्यासाठी पावले उचलली असून कवडीमोल किंमतीने देशाची ही मालमत्ता विकली जात आहे. एअर इंडिया ही तोट्यातली कंपनी सरकारने टाटा समूहाला केवळ १८ हजार कोटी रुपयांना विकली. मात्र त्यांची अन्य ४० हजार कोटी रुपयांची कर्जे सरकार फेडणार आहे. ती कर्जे फेडण्याची जबाबदारी टाटांची नाही. त्यामुळे टाटांसाठी हा सौदा फायद्याचा व सरकारसाठी घाट्यातला सौदा ठरला आहे. भारत पेट्रोलियम या सुमारे चार लाख कोटी रुपये किंमतीची कंपनी सरकार आता एक लाख कोटी रुपयांपेक्षा कमी किंमतीला विकायला काढत आहे. जवळजवळ सर्वच सरकारी कपंन्या अशा प्रकारे स्वस्तात विकल्या जाणार आहेत. जनतेच्या पैशातून उभारलेल्या या कंपन्या आता खासगी उद्योजकांच्या घशात स्वस्तात घातल्या जात आहेत. केंद्र सरकारला कृषी क्षेत्रात खासगी भांडवलदारांना प्रवेश द्यायचाच होता आणि त्यासाठी सुधारणेतेचे आवरण दाखवित कृषी क्षेत्रात तीन नवीन विधेयके आणली गेली. परंतु शेतकऱ्यांनी गेले वर्षेभर मोठा संघर्ष करीत हे कायदे रद्द करायला लावले. यातून केंद्र सरकारची कृषी क्षेत्रातली सर्व योजनाच बारगळली. परंतु आता स्टेट बँकेच्या माध्यमातून खासगी उद्योजकांना कृषी क्षेत्राच्या कर्जाचे दरवाजे खुले केले जात आहेत. सर्वसामान्य माणसे किंवा शेतकरी हे बँकांची कर्जे बुडवत नाहीत. तर बडे उद्योजकच सरकारला हाताशी घेऊनच बँकांची कर्जे बुडवतात, हे वारंवार सिध्द झाले आहे. मोदी सरकारच्या गेल्या सात वर्षाच्या काळात १० लाख ७२ हजार कोटी रुपयांची कर्जे माफ केली गेली. त्यापूर्वी असलेल्या डॉ. मनमोहनसिंग सरकारच्या काळात झालेल्या कर्जमाफीच्या तुलनेत मोदी सरकारची कर्जमाफी ४८० टक्क्यांनी वाढली आहे. असा प्रकारे जर ही कर्जमाफी सुरु राहिली तर एक दिवस देश दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर येऊन ठेपल्याशिवाय राहाणार नाही. सरकारी उपक्रम थेट न विकता येणार त्यांना खळखिळे करुन विकण्याची ही योजना आहे. स्टेट बँक-अदानी करार हे त्यातील एक महत्वाचे पाऊल ठरावे. अशाच प्रकारचा एक करार स्टेट बँकेने जिओशी देखील केला आहे २०१५ ला बँकिंग परवाना मिळालेल्या जिओ पेमेंट बँकेसोबत स्टेट बँकेने सामंजस्य करार केलेला आहे, हा करार करताना स्टेट बँकेच्या अध्यक्ष होत्या अरुंधती भट्टाचार्य. या मॅडम निवृत्त झाल्यावर रिलायन्सच्या संचालक मंडळात जाऊन बसल्या आहेत. आता देखील अदानींबरोबर सहकार्य करार करणाऱ्या स्टेट बँकेकडे एवढे ग्रामीण भागात नेटवर्क आहे, कर्मचारी वर्ग आहे, तरी देखील अदानींशी सहकार्य करार का करावासा वाटतो, याचे उत्तर सरकारने दिले पाहिजे. कारण या बँकेची ५० टक्क्याहून जास्त मालकी भारत सरकारकडे आहे. आता अदानी कॅपिटल कुठल्या शेतकऱ्याला, कुठल्या राज्याला, कुठल्या प्रदेशाला, कुठल्या पिकाला किती कर्ज द्यायचे, द्यायचे कि नाही द्यायचे हे कोण ठरवणार तर अदानी कॅपिटल. अदानी ऍग्रो लॉजीस्टिक आधीच स्थापन झालेली आहे, जिने देशभरात विशेषतः हरियाणा पंजाब राजस्थान मध्ये मोठमोठे लोखंडी गोदाम उभारलेले आहेत, खाजगी रेल्वे लाईन टाकलेली आहे, त्यांना शेतकऱ्यांचा शेतमाल विकत घेऊन साठवून योग्य वेळी विकायचा आहे. आता ज्यांना कर्ज हवे आहे त्यांनी माल कुठे विकायचा, कुठल्या गोदामात ठेवायचा याची बंधने बँकेच्या वतीने घातली गेली तर काय होईल? कृषी कर्जाच्या नावाने याच कॉर्पो रेट कंपन्यांच्या गोदाम, शेतमाल साठवणूक आणि प्रक्रिया करणाऱ्या अतिप्रचंड कारखान्यांना कर्जे वाटली तर काय होईल? साठच्या दशकात तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी कृषी क्षेत्र, लघु आणि मध्यम उद्योगांची उभारणी करायला पतपुरवठा सुरळीत व्हावा या उद्देशाने बँकांचे राष्ट्रीयकरण केले होते, स्टेट बँकेचा हा करार नेमका या उद्देशाच्या उलट आहे.

पत्र तुझे ते येता अवचित...

विशेष
क्षितिजा देव

पत्र वाचणं आणि लिहिणं हा महत्त्वाचा भाग असतो. आयुष्यात वेगवेगळ्या प्रसंगी, शिष्टाचाराच्या ठराविक भाषेतच काही पत्रं लिहावी लागतात. नोकरीचा अर्ज करण्यासाठी, एखाद्याचं अभिनंदन करण्यासाठी, सांत्वन करण्यासाठी अशी वेगवेगळ्या कारणासाठी किती तरी पत्रं लिहावी लागतात. म्हणूनच शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या प्रसंगांची पत्र लिहिणं आजदेखील शिकवलं जातं. या मनस्वी लेखनकौशल्यावर टाकलेला झोत.

दिवाळीची घाई संपल्यानंतर थोडा निवांत वेळ मिळाला तेव्हा सामानाची आवराआवर करताना काही जुने, संस्मरणीय फोटो आणि त्याच्या खाली एक कागदाचं पाकीट सापडलं. त्यात काय आहे ते बघण्यासाठी उघडलं आणि मलाच आठवलं! वेगवेगळी, स्मरणीय प्रसंगी आलेली पत्रं मी जपून ठेवली होती त्यात. मोठा भाऊ परदेशी गेल्यावर भाऊबीजेच्या दिवशी आलेलं, त्याच्या गैरहजेरीबद्दल सम जूत घालणारं पत्र वाचताना आजही डोळे ओलावले. आता केवळ आठवणीत उरलेल्या वडिलांचं माझ्या वाढदिवशी बाहेरगावाहून आलेलं पत्र वाचताना त्यावर हळूवारपणे हात फिरवला मी... त्यांचा स्पर्श झाल्याचा भास झाला त्यात! कॉलेजजीवनात एका निबंध स्पर्धेत पहिलं बक्षीस मिळाल्यानंतर आलेलं संपादकांचं अभिनंदनाचं पत्र वाचताना आजही स्वत:चा अभिमान वाटला. केवढा आत्मविश्वास मिळवून दिला होता त्यावेळी त्या पत्रानं! नवीन लिखाणासाठी मोठी प्रेरणा मिळाली होती. आपण अशी किती तरी भावनिक पत्र जपून ठेवली हे किती बरं झालं, असं मला वाटलं. मी हळूवारपणे त्या सगळ्या पत्रांवरून पुन्हा पुन्हा हात फिरवत राहिले.

पत्र म्हणजे भावना पोहचवण्याचं खूप प्रभावी माध्यम आहे, नाही का! खरं तर पत्र पाठवणं ही संकल्पना फार पुरातन काळापासून अस्तित्वात आहे. फक्त त्या माहेरी पोहोचलेली असायची. पत्रातल्या वेळी त्याचं स्वरूप वेगळं होतं. महाभारतामध्ये रुक्मिणीनं श्रीकृष्णाला एका सेवकाच्या हाती पत्र पाठवून आपलं मनोगत व्यक्त केलं होतं. राजघराण्यातले राजे-महाराजे शेजारच्या देशातल्या राजांशी संवाद साधण्यासाठी जे पत्र सेवकाहाती पाठवत, त्याला 'खलीता' असं म्हटलं जात असे. इतकंच काय, पत्र पाठवण्यासाठी कबुतराचाही खूप चांगला उपयोग केला जात होता. पत्र चोचीत धरून कबूतर नेमक्या व्यक्तीला नेऊन देत असे. एकूण काय, तर माणसाला पूर्वीपासूनच पत्र पाठवणं या गोष्टीची नितांत आवश्यकता जाणवत होती.

कालांतराने टपाल खातं सुरू झालं आणि 'पत्र' माणसाच्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनला. कारण त्याशिवाय संपर्काचं दुसरं कुठलंही साधन उपलब्ध नव्हतं. दूरदेशी असलेल्या जीवाभावाच्या माणसाची खबरबात मिळण्यासाठी पत्र हे एकच माध्यम होतं. तिथून आपल्या प्रिय माणसाचं पत्र आलं आणि त्याची खुशाली कळली की सगळं कुटुंब आनंदून जायचं! मग ती दुसऱ्या गावी नांदायला गेलेली विवाहित कन्या असो किंवा नोकरीसाठी अथवा युद्धावर गेलेला लाडका लेक असो! आजही आठवतं, लहान असताना दूर गावी राहणाऱ्या मोठ्या विवाहित बहिणीचं पत्र आलं की आईचा चेहरा आनंदानं अगदी उजळून निघायचा. आईचं माहेर म्हणजे अगदी खेडेगाव. त्यामुळे दोन-तीन इयत्तांनंतर अक्षर ओळख विसरलेल्या आईला पत्र वाचणं शक्य होत नव्हतं. मग तिच्या माहेरून आलेलं मामाचं पत्र वाचून दाखवायचं काम माझ्याकडेच असायचं. पत्र ऐकताना आई मनाने केव्हाच मजकुराच्या अनुषंगानं स्वतःशीच काही तरी बोलायची. मला पुन्हा पुन्हा पत्र वाचून दाखवायला लावायची आणि 'नीट सावकाश वाच गं...' म्हणत तंबी द्यायची. मला कधी कधी या गोष्टीची कटकटही वाटायची. मामाची ती वाचता न येणारी पत्रही तिने तिच्या ट्रंकच्या तळाशी जपून ठेवलेली असायची. त्यावर ती हळूवारपणे हात फिरवायची.

आज जपून ठेवलेल्या पत्रांवरून हात फिरवताना मला तिची आठवण आल्यावाचून राहिली नाही! घरादाराची, नातेवाईकांची खबर देणारी ही पत्रं किती वेगवेगळ्या प्रसंगांची असायची. खुशालीच्या पत्रांबरोबरच कुणाला नोकरी लागल्याचं तर एखाद्याचं लग्न जमल्याचं पत्र; एखाद्या कार्याच्या आमंत्रणाचं पत्र, एखादी दुखद बातमी देणारं पत्र... अशी असंख्य कारणानं आलेली पत्रं वाचायला माणसं उत्सुक असत. एखाद्या नववधूला पतीचं किंवा प्रियकराचं प्रेयसीला आलेलं पत्र किंवा प्रेमिकांच्या पत्रांची देवाणघेवाण हा तर एकूणच समाजातला 'रोमँटीक' म्हणून लोकप्रिय विषय झाला होता. म्हणूनच त्या काळी प्रतिभाशाली कवींनी या विषयावर अनेक कविता केल्या. त्या गायल्या गेल्या आणि गाणं म्हणूनही प्रसिद्धही झाल्या. पत्र तुझे ते येता अवचित, गाली लाली फुलते नकळत किंवा हिंदीतलीही ये मेरा प्रेमपत्र पढकर... अशी गाणी खूपच लोकप्रिय झाली होती. मला आठवतं ते आमच्या वेळी वार्षिक परीक्षेत एखादा विद्यार्थी नापास झाला असेल तर निकालाच्या दोन दिवस आधी विद्यार्थी नापास झाल्याचं कळवण्यासाठी शाळेकडून येणारं लाल रंगाचं पत्र. जेणेकरून त्या विद्यार्थ्याला निकालाच्या दिवशी शाळेत यायला लागू नये. त्यामुळे चार मुलांमध्ये त्याचं हसं होणं आणि न्यूनगंड निर्माण होणं हे वाईट प्रसंग टळावेत. त्या विद्यार्थ्यांच्या मानसशास्त्राचा केलेला मोठा विचार त्यामागे असायचा! अशा वेळी पत्र अतिशय कामाला येत असे.

पत्र वाचणं आणि लिहिणं हा महत्त्वाचा भाग असतो. कारण आयुष्यात वेगवेगळ्या प्रसंगी, शिष्टाचाराच्या ठराविक भाषेतच ती पत्रं लिहावी लागतात. नोकरीचा अर्ज करण्यासाठी, एखाद्याचं अभिनंदन करण्यासाठी, सांत्वन करण्यासाठी अशी किती तरी पत्रं लिहावी लागतात. म्हणूनच शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या प्रसंगांची पत्रं लिहिणं आजदेखील शिकवलं जातं. पत्राच्या कागदाची जागा आता व्हाट्स अपने घेतली आहे इतकंच! काळ कितीही पुढे गेला तरी पत्रलेखनाचं महत्त्व तेवढंच आहे हे नाकारता येत नाही. अर्थात हे ही तितकंच खरं की चांगल्या पत्रलेखनासाठी शब्दांचं भांडार जवळ असावं लागतं. शितावरून भाताची परीक्षा होते तसं पत्रावरून व्यक्तीच्या बौध्दिक पातळीची परीक्षा होत असते. तिच्या व्यक्तिमत्त्वाचं, विचारांचं दर्शन त्यातून घडत असतं. चांगलं पत्र कसं असावं याला काही अलिखित संकेत आहेत. पत्रात स्वत:ची खुशाली सांगावी तसंच दुसऱ्याचीही विचारपूस करावी. 'अपनी कहो, कुछ मेरी सुनो' असा सुंदर मिलाफ त्यात असावा. एखादी आनंददायी आठवण ताजी करणारी घटना जरुर सांगावी. लहानपणी शाळेत मिळालेले पत्रलेखनाचे संस्कार नंतर बरीच माणसं विसरतात. ते कधी कुणाला पत्र पाठवत नाहीत. म्हणूनच एखाद्या प्रसंगी पत्र लिहावं लागलं तर त्यांच्याकडची शब्दसंपत्ती कमी पडते आणि कसं आणि काय लिहायचं हे त्यांना सुचतच नाही.

यथावकाश टेलिफोनची सुविधा उपलब्ध झाली तरी पत्राचं महत्त्व कमी झालं नव्हतं. भारतीय इतिहासातल्या अनेक थोर व्यक्तींनी आपल्या प्रियजनांना आणि भारतवासीयांना लिहिलेली पत्रं ही तर देशाची संग्रहणीय अशी मौलिक संपत्ती ठरली आहे. स्वातंत्र्यापूर्वीच्या काळात ज्येष्ठ विचारवंत आणि निस्सीम देशभक्त 'लोकहितवादी' यांनी भारतवासीयांना जागवण्यासाठी 'प्रभाकर' नावाच्या वृत्तपत्रातून लिहिलेली १०८ पत्रं 'शतपत्रे' या नावानं प्रसिद्ध आहेत. डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांनी 'लोकहितवादींची शतपत्रे' या नावानं ती पुस्तकरूपात प्रसिद्ध केली आहेत. अशा पत्रांमध्ये इतिहास, राजकारण, अर्थशास्त्र, खऱ्या धर्माची ओळख सांगणारी, ज्ञानाने ओतप्रोत भरलेली अनेक रत्नं दडली आहेत. थोर तत्वचिंतक स्वामी विवेकानंद यांनी अंधश्रद्धा आणि अशिक्षितपणाच्या गर्ते त सापडलेल्या भारतीयांना सुधारण्यासाठी त्यांना उद्देशून अनेक पत्रं लिहिली. त्यात समाजसुधारणा,शिक्षण, राष्ट्राची उन्नती, तत्वज्ञान अशा मौलिक विचारांचा अमूल्य साठा आहे. त्यांनी भारतीय युवा शक्तीला खूप महत्त्व दिलं आहे. युवकांना आत्मविश्वास देताना त्यांनी पत्रात लिहिलं आहे , 'उठो मेरे शेरो! इस भ्रमको मीटा दो की तुम निर्बल हो! तुम स्वछंद जीव हो!' मुलांच्या आवडत्या नेहरू चाचांनी मसुरीला असताना त्यांच्या प्रिय कन्येला म्हणजेच इंदिरा गांधी यांना लिहिलेली पत्रं अतिशय वाचनीय आहेत. त्यामध्ये भारतीय संस्कृतीची ओळख, सभ्यता म्हणजे काय, चांगल्या सवयी कशा लावून घ्याव्यात, त्याचं महत्त्व काय तसंच जनता संपर्क आणि पर्यटनाचं महत्त्व काय आदी गोष्टी तिला समजावल्या आहेत. ती शिकवण आजच्या काळातल्या सर्व मुलांनाही लागू पडते. ही पृथ्वी कशी निर्माण झाली, एकूण समाज आणि रितीरिवाज कसे निर्माण झाले हे त्यांनी ओघवत्या भाषेत समजावलं आहे. ती पत्रं म्हणजे ज्ञानाची गंगाच आहे. तसंच प्रसिद्ध लेखक साने गुरुजी यांनी लिहिलेली पत्रं माणसातल्या माणुसकीचा शोध घेणारी, कोकणातलं निसर्गसौंदर्य दाखवणारी आहेत. म्हणूनच त्यांना 'सुंदर पत्र' म्हटलं जातं. अशा थोर व्यक्तींनी पत्रं लिहिली म्हणूनच आज भारतीयांना त्या रुपातलं कायमचं धन मिळालं आहे. म्हणून वाटतं की पत्रलेखन ही आनंदमयी अशी सांस्कृतिक परंपरेची पालखी आपण पुढे न्यायला हवी. पुढच्या पिढीलाही ती इच्छित ध्येयाप्रत जाण्यास मार्गदर्शक ठरू शकेल.

महामंडळाला जपायला हवे

आठवण
डॉ. रमेश वार्डे
९३२६००४७४३

अलिबाग येथील एस.टी.बस स्टँड हा अत्यंत योग्य ठिकाणी असून हा डेपो मागील सत्तर वर्षे सेवा देत आहे. या डेपोचे वैशिष्ट्य म्हणजे या डेपोची मुख्य गाड्या सुटण्याची इमारत मागील साठ वर्षे सर्व प्रकारची संकटे झेलीत उभी आहे. या मुख्य गाड्या सुटण्याच्या जागेत एका वेळी सहा गाड्या उभ्या राहत असत. आणि एवढी जागा त्यावेळी पुरेशी होत असे. पुढे विभाग नियंत्रक यांनी डेपोच्या उत्तरेकडील बरीच मोठी जागा जी खाजण जमीन होती त्यातून मिळविली. त्यामुळे डेपोला भरपूर जागा उपलब्ध झाली व लांब पल्ल्याच्या गाड्या या नवीन भागात लावल्या जाऊ लागल्या. आता पुरेशी जागा आहे. तांत्रिक कामासाठीही वेगळी इमारत व भरपूर जागा आहे. १९६१ सालात बांधलेल्या इमारतीच्या आधी डेपोच्या दक्षिण बाजूला जेथे विहीर आहे. त्या भागात पत्र्याचा एस.टी. डेपो होता व सुरुवातीला निळ्या रंगाच्या बस असत. त्याही थोड्या आकाराने लहान होत्या. आता जी लालपरी बस आहे ती फारच मोठी आहे. लांबीला ही जास्त आहे. त्यामुळे या गाड्या हाताळणे, चालविणे ही मोठीच जबाबदार चालकावर असते व महामंडळाचे सारे पालक या गाड्या उत्तम प्रकारे हाताळीत आहेत. त्यामुळे अपघाताची कधी प्रवाशाला भिती वाटत नसे. जो एस.टी. बसमध्ये बसला तो प्रवासी सुखरुप आपल्या गावी पोहोचत असे. थोडीसुद्धा चिंता घरच्या मंडळींना वाटत नाही. त्यामुळे एस.टी. बसचा प्रवास म्हणजे बिनधोक्याचा असे. त्यावेळी मोबाईल वगैरे नव्हते. त्यामुळे प्रवासी त्या गावी पोहोचला की कार्ड पाठवित असे ते कार्ड चार-दोन दिवसांनी मिळे व तेव्हा कळे की आपण माणूस सुखरुप पोहोचला. मात्र प्रवासात कधीच धोका होत नसल्यामुळे घरची माणसं चिंता करीत नसत.

अलिबाग डेपोला उत्तरेकडील नवीन जागा मिळाली तेव्हा ती दलदलीची होती, दगडांचा भराव करुन त्या जागेची उंची वाढविण्यात आली. पुढे सिमेंटचा कोबा करुन ती जागा मजबूत करण्यात आली. आता डेपोतील सर्वत्र जागा कोबा करुन नीटनेटक्या तयार केल्या आहेत. याचमुळे गाड्या सुटण्याची इमारत अजूनही मजबूत आहे. त्यावेळीच उपमंत्री श्री. वत्राजिरा व दत्ता खानविलकर यांच्या हस्ते या इमारतीचे उद्घाटन १९६१ सालास होणार होते. परंतु वेळेअभावी गडबडीत उद्घाटन झाले नाही व डेपो इमारतीचे उद्घाटन न होता. असाच तो वापरला जाऊ लागला. आता या इमारती कॅन्टीन बाजूला आहे. बाकी भाग बुकींगसाठी व कार्यालयासाठी ठेवण्यात आला आहे. मात्र प्रथमदर्शनी भाग विद्रूप झाला आहे. त्याला रंगरंगोटी करणे आवश्यक वाटत आहे. म्हणजे हा डेपो सौंदर्यात भर घालील. शिवाय आणखी काही काम होणे आवश्यक वाटत आहे. या डेपोच्या जागेत दिवसारात्र काही लोक वस्तीला असतात. त्यांचा बंदोबस्त व्हायला हवा आहे. तसेच कुत्र्यांचा फारच त्रास होतो. म्हणून डेपोत येणाऱ्याला तिकीट ठेवायला हवे आहे. म्हणजे स्वच्छतावर राहिलच पण ज्यांचे इथे काही काम नाही असे जे लोक बसलेले, झोपलेले असतात त्यांचा बंदोबस्त होईल. व डेपो स्वच्छ, सुंदर राहील. आता तर एस.टी. महामंडळाने सुरक्षारक्षक नेमले आहेत ते लोक आपले काय अत्यंत चोख करतात त्यांना जर डेपोत येणाऱ्याला तिकीट तपासण्याचा अधिकार द्यावा म्हणजे भटके लोक डेपोत येणार नाहीत तसेच कुत्र्यांचा त्रास कमी करणे शक्य आहे. एवढे काय झाले तर हा डेपो पूर्वीप्रमाणे छानसा होईल. पूर्ण डेपोत एक रस्ता आत जाणारा व दुसरा जाहीर जाणारा असावा.

एस.टी.ची सार्वजनिक वाहतूक हा गरीबांचा व श्रीमंतांचा ही आधार आहे. सुखकर प्रवास एस.टी. बसद्वारे लोक करीत असतात व प्रवास अत्यंत स्वस्त असतो. हे सार्वजनिक वाहतूक साधन आपण जपले पाहिजे व त्याला आणखी शिस्त लावणे आवश्यक वाटत आहे. सोन्याची अंडी देणारी ही कोंबडी आहे. अजूनही ती सोन्याचीच अंडी देते मात्र या कोंबडीची काळजी घेणारे कमी खोल आहेत. बराच मोठा उत्पन्नाचा वाटा सरकार जमा होतो तरीही एस.टी. बस फायद्यात चालते. प्रशासन उत्तम असेल तर पुनः एस.टी. आणखी फायद्यात येईल. टायर खरेदी, अन्य खरेदी यात भ्रष्टाचार होत असल्यामुळे एस.टी.चे नुकसान होते. त्याला आवर घालायला हवा. विभाग नियंत्रक, डेपो व्यवस्थापक शिस्तीने वागणारे हवे आहेत. एकेकाळी असे सर्व काही होते. एस.टी. कामगार व कर्मचारी यांना शासकीय कर्मचाऱ्यांपेक्षा चांगला पगार द्यायला हवा आहे व तो देता येणे शक्य आहे. मात्र प्रशासक कडक शिस्तीचे हवे आहेत. स्वातंत्र्य मिळाल्यावर एस.टी. महामंडळ सुरु झाले. प्रत्येक राज्यात असे महामंडळ आहे व ते स्वतंत्र आहे व चांगले उत्पन्न मिळवित आहे. वर एस.टी. कर्मचारी व कामगार यांना चांगले वेतन देणे सहज शक्य आहे. जोवर सरकार घेणे तो कमी करायला हवा आहे व प्रशासन नीट चालले तर एस.टी. तल्या नोकरी सारखी नोकरी नाही असे म्हणता येईल. एखादा चांगला मंत्री एस.टी.च्या खात्याला मिळाला तर हे काम सहज होईल.

मात्र प्रशासन ठीक नाही व भ्रष्टाचार होतो म्हणून एस.टी.चे शासनात विलिगीकरण करण्याची जरुरी नाही. तेथेही एस.टी. भ्रष्टाचाराने कुडले तसेच याबाबत न्यायालयाचा तिथले हाती यावयाचा आहे तोपर्यंत धीर धरावयास हवा आहे. न्यायालयावर दडपण आणून संप करणे चूक आहे. २८ संघटनांचे नेते एक व्हायला हवे आहे. ते शक्य होईल असे वाटत नाही. मनात येईल तसे नेते बडबडत असतात व सामान्य कर्मचारी व कामगार यांची फसवणूक होत आहे.एकेकाळी जॉर्ज फर्नांडिस यांनी रेल्वेतील सर्व संघटना एकत्र आणून रेल्वेचा संघ घडविला होता. तशी ताकद आताच्या नेत्यात नाही. तसेच एस.टी. महामंडळाबाबत असे काही करायला लागणार नाही. आर्थिक मागण्या पूर्ण झाल्या आहेत. लहानसहान दुरुस्त्या करता येणे शक्य आहे व आधी कोरोनाने सारे सरकार व जनता नाडलेली असताना हा संप चालू ठेवून गरीब प्रवाशांचे मोठे नुकसान होत आहे व सरकारचे व महामंडळाचे उत्पन्न बुडत आहे. कर्मचारी, कामगारांचे हाल सुरु आहेत म्हणून रबर केवढे ताणावे याचा हिशोब जमला नाही तर मोठे नुकसान होईल. पुढाऱ्यांनी हा संप मिटविलाच पाहिजे व एस.टी. पूर्वीचे दिवस मिळवून द्यायला हवे आहेत. पूर्वीची एस.टी. आताही तशीच रुबाबात धावावी असे वाटते.

साठीची अनोखी भेट

प्रतिभेची अक्षरे

पुस्तकाचे नाव : प्रतिभेची अक्षरे
लेखिका: सौ. अनघा अशोक लिमये
प्रकाशक : अशोक लिमये, साडवली (देवरुख) जिल्हा रत्नागिरी.
प्रकाशन : २२ जून २०१५.
पृष्ठे : ७७.

पुस्तक परीक्षण
प्रा. शाम जोगळेकर

प्रतिभेची अक्षरे हे अनघा अशोक लिमये यांचे पुस्तक साडवली तालुका संगमेश्वर जिल्हा रत्नागिरी येथे प्रकाशित करण्यात आले. या पुस्तकाला अशोक यांची प्रस्तावना आहे. अनघा यांचे बी.ए. पर्यंत शिक्षण झाल्यावर त्यांचे विवाहानंतर प्रपंचामुळे पुढील शिक्षण थांबले. एम. ए.साठी बाहेरून केलेल्या प्रयत्नांना यश आले नाही. देवरूख येथील गुरु डॉ. सुरेश जोशी यांच्या प्रेरणेने आणि प्रोत्साहनामुळे अनघा यांनी साहित्याच्या आवडीतून लेखन सुरूच ठेवले. डॉ. सुरेश जोशी यांच्या निवडीतून अनघा यांच्या निवडक साहित्याचे प्रकाशन या पुस्तकाच्या रूपाने अनघा यांच्या साठाव्या वाढदिवशी भेट म्हणून प्रकाशित केले गेले.

मनोगत मध्ये अनघा यांनी सविस्तरपणे आपल्या लेखन प्रवासाविषयी लिहिले आहे. लेखन-वाचनाच्या आवडीतून त्यांचा पुस्तक परीक्षण करण्याचा छंद जोपासला गेला. विवाहापूर्वीचा वाचन, लेखनाचा छंद अनघा यांनी विवाहानंतर कायम ठेवला आहे, हे विशेष! या पुस्तकात १७ लेख आणि काही कवितांचाही समावेश करण्यात आला आहे. १९६९ ते २०१२ या प्रदीर्घ काळात केलेल्या विविध प्रकारच्या लेखनापैकी निवडक लिखाणाचा या पुस्तकात समावेश करण्यात आला आहे.

'गडकऱ्यांचा गोकूळ' या पहिल्या लेखात अनघा यांनी राम गणेश गडकरी यांच्या प्रेमसंन्यास नाटकातील 'गोकूळ' या पात्राविषयीचे विचार मांडले आहेत. गोकूळची विविध वैशिष्ट्ये सोदाहरण दर्शविली आहेत. गोकूळ सनातनी विचारांचा असल्याने त्यानुसार त्याची मते बनली होती. मात्र त्याच्या भोळ्याभाबड्या वृत्तीमुळे तो लक्षात राहतो.

आचार्य अत्रे हे लेखक म्हणून का आवडतात हे अनघा यांनी सविस्तरपणे मांडले आहे. त्यांचे व्यक्तिमत्त्व अष्टपैलू होते. अनेक क्षेत्रांत त्यांनी उत्तम कार्य केले होते. पंडित नेहरू राजकीय विरोधक होते. परंतु त्यांच्या मृत्यूनंतर त्यांनी सतत बारा दिवस अग्रलेख लिहिले.

'सूर्यास्त' या नावाने ते लेख प्रसिद्ध आहेत. अत्र्यांच्या मृत्यूमुळे महाराष्ट्रातील वाङ्मय सरस्वतीचा मुकुटमणी निखळला असे अनघा यांना वाटते. 'कवी नागेशांची कविता' या दहा पृष्ठांच्या सविस्तर लेखात लेखिकेने नागेश यांच्या कवितेचे सोदाहरण उत्तम विवेचन केले आहे.'मला समजलेली यथार्थ गीता' या लेखात अनघा यांनी गीतेचा सारांश मांडला आहे. त्यांच्यामध्ये आत्मा अमर असल्याने मृत्यूनंतर शोक करू नये. श्राद्धादी विधी, पिंडदान करणे मुळीच आवश्यक नाही.

प्रकाश खाडिलकर आणि प्रकाश आपटे यांचे **स्नेहमुद्रा** हे पुस्तक मुद्रण व्यवसायातील अनुभव कथन करणारे पुस्तक आहे. या पुस्तकाचा उत्तम परिचय करून देण्यात आला आहे. त्यांच्या मते मुद्रण व्यवसायातील त्यांचे अनुभव हे केवळ त्या दोघांचे नसून समस्त मुद्रण व्यावसायिकांचे आहेत. या पुस्तकाचे सर्वांगीण दर्शन या परिचयात्मक लेखातून होते आहे. देवरूख येथील महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. सुरेश जोशी यांच्या 'एकदा तरी पायी अनुभवावी पंढरीची वारी' या पुस्तकाचा परिचय अनघा यांनी उत्तमरीत्या करून दिला आहे. ईश्वरनिष्ठांच्या मांदियाळीतील एका अभक्ताला आलेले अनुभव वाचून, मूळ पुस्तक वाचण्याची वाचकाला इच्छा होते.

राम खांडेकर यांचे 'यशवंत स्मृतीगंध' हे यशवंतराव चव्हाण यांच्या आठवणी सांगणाऱ्या पुस्तकाचा परिचय अनघा यांनी उत्तम प्रकारे करून दिला आहे. 'आहे मनोहर तरी' हे सुनीता देशपांडे यांचे पुस्तक कसे आणि का आवडले हेही लेखिकेने सविस्तरपणे मांडले आहे.

'बोरकरांची विरक्तीपर कविता', विंदा करंदीकर, पु.भा.भावे, बाळशास्त्री जांभेकर, स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे संबंधीचे लेख माहितीपूर्ण आणि विचारांना प्रेरणा देणारे आहेत. मैत्री गाणी आणि गंमत गाणी या पत्रकार जयपाल पाटील यांच्या दोन बालकवितांच्या संग्रहांचा परिचय उत्तम झाला आहे.

कोल्हापूरला डॉ. अपर्णा रामतीर्थकर यांचे व्याख्यान ऐकून अनघा यांनी आपले विचार सविस्तरपणे 'स्त्री शक्ती आणि समन्वय' या लेखात उत्तम प्रकारे, सोदाहरण मांडले आहेत.वेळोवेळी विविध भावावस्थेत अनघा यांनी लिहिलेल्या काही कविताही या पुस्तकात समाविष्ट झाल्या आहेत.

'प्रतिभेची अक्षरे' हे पुस्तक अनघा यांच्या साठाव्या वाढदिवशी त्यांच्या घरातील सर्वांनी आणि गुरु डॉ.सुरेश जोशी यांनी त्यांना दिलेली एक अनोखी भेट आहे. पुस्तकातील विविध छायाचित्रांमुळे हे पुस्तक उत्तम सजले आहे. साहित्यनिर्मितीचा अनघा यांचा प्रवास असाच सुरु राहो अशी शुभेच्छा या लेखाच्या निमित्ताने द्यावीशी वाटते.

९२७३३४३१७७

कविता

राष्ट्रसंत गाडगेबाबा

असत्यास नाही थारा
सत्य ज्यांच्या ठायी
आला याचक दारात
भाकर वाढ गे माई ।

श्रमिकांचे दुःख ज्यांच्या
मनी शल्य झाले
दुःखे हलकी कराया
दुःखे स्वतः सोशीले
संगे गाडगेबाबांच्या साता
जन्माची पुण्याई ।।

जीवनात दुःख सारे
अनुभवास आले
याच्या त्याच्या भाकरीचे
भार डोई झाले
जनसेवेत केली
जनऋणाची उतराई ।।

जातीभेद अंधश्रद्धा नसे
मान्य ज्यांना
राष्ट्रसंत गाडगेबाबा मान्य
झाले लोकांना
कुंताईच्या सौभाग्याचा
मानपान होई ।।

दीनअनाथांची सेवा हाच
धर्म त्यांचा
संस्काराचा पाडला पाया
छंद कीर्तनाचा
कीर्ती गाडगेबाबांची सर्वा
स्फूर्तिदायी ।।

– अनंत केशव देवघरकर
अलिबाग
९४ २० ६४ ५७ २८

आभास हा छळतो मला!

निसर्गाचं जग हे किती मायावी आणि किती फसवं असतं ना हा प्रश्न पडतो. माणसाच् आयुष्यही हे असं मृगजळानेच व्यापलेलं असावं असं वाटतं कधी कधी. आशाळभूतपणाचे क्षण वारंवार आयुष्यात येतात आणि ते मृगजळ ठरते.



शब्दगंधा
शशिकांत मुद्देबिहाळकर
९७६७१५२६०८

आभास म्हणजे काहीतरी दिसणे, पण वास्तवात मात्र ते नसणे. यातील एक नैसर्गिक आभास म्हणजे मृगजळ. तहानलेल्या वाटसरूला, रस्त्याच्या लांब पल्यावर वाहत्या पाण्याचा निर्झर दिसतो, त्या दिशेने तो वेडयासारखा धावत रहातो , काही केल्या निर्झर जवळ येत नाही, अंतर कमी होत नाही. तहानेनं व्याकूळ झालेला तो वाटसरू शेवटी तहानलेलाच रहातो.कारण ते अखेर मृगजळ असतं. मृगांसारखे मुके प्राणी जिथे फसतात तिथे माणसाचं काय? मृगजळ तयार होणं ही एक नैसर्गिक आभास निर्माण करणारी प्रक्रिया आहे.

प्रकाश किरणांच्या दिशेत ऊष्ण हवेत होणाऱ्या वक्रीकरणामुळे दिसणाऱ्या किंवा भासणाऱ्या पाण्याच्या प्रतिमेस मृगजळ असे म्हणतात. काही वेळा साठी थंड(घन) हवेच्या थरावर गरम हवेचा थर असतो व सुर्य किरण घन हवेतून कमी घन हवेत शिरताना वक्रीभूत होतात आणि परिवर्तीत होऊन वाळवंटातून प्रवास करणाऱ्या माणसांच्या डोळयापर्यंत पोहोचतात त्यामुळं वाळवंटात सपाटीवर आजूबाजूच्या झाडांची किंवा आकाशाची प्रतिमा दिसते आणि पाण्याचा भास होतो.

निसर्गाचं जग हे किती मायावी आणि किती फसवं असतं ना हा प्रश्न पडतो. माणसाच् आयुष्यही हे असं मृगजळानेच व्यापलेलं असावं असं वाटतं कधी कधी. आशाळभूतपणाचे क्षण वारंवार आयुष्यात येतात आणि ते मृगजळ ठरते. तीने त्याच्या खांद्यावर निर्धास्तपणे डोके ठेवावे एक आधार मिळाल्याच्या सुखाचा क्षण म्हणून, पण ते असते लांबवरून दिसणारे मृगजळ, तिची पायपीट सूरू असताना तिला जे सगळे खरे वाटत असते, तो निव्वळ भास असतो हे तिच्या लक्षात येते तेंव्हा खूप ऊशीर झालेला असतो ,रस्ता संपता संपत नाही, सुखाच्या निळयाभोर आकाशाचे आणि हिरव्या कंच वृक्षराजीचे ते तिला दिसलेले पाण्यातील प्रतिबिंब खोटे असते. तेथे पाणीही नसते, सुखाचा ओलावाही नसतो, निव्वळ रुक्ष रेताड भला मोठा एक खड्डा असतो.ज्याच्या खांद्यावर तिने निर्धास्त मनाने डोके टेकले तो दुसर्या वाटेने तिच्याकडे न पाहताच निघून गेल्याचे तिला जेंव्हा समजते तेंव्हा खोटे भासणारे ते मृगजळ प्रत्यक्षात मात्र खऱ्या रुपात तिच्या डोळयात ऊभे रहाते .आयुष्यात सुखाच्या स्वप्नांच्या मागे आपण कोणतेही भान न ठेवता जेंव्हा धावत सुटतो तेंव्हा ते दुरवर दिसणारे ते मृगजळ तर नव्हे? हा निसर्गाने शिकवलेला एक साधा प्रश्न आपल्या मनाला शिवत नाही कारण ते मृगजळ बघण्यात आपण आपल्याला गुंतवून घेतलेले असते. सुखाची तहान लागलेली असते. कधी एकदा तिथे पोहोचतो आणि सुखाची तहान भागवतो असे होऊन गेलेले असते. ते दूर का पळते आहे हे ही आपलयाला कळत नाही. त्याची सुंदरता नयाहाळण्यातच आपण गुंतून जातो.ते सौंदर्य खोटे आहे असे समजायचे कारणच काय ? हा प्रश्न मनात येणे स्वाभाविक असते. मग कोणाचे ऐकायचे आणि कशाला? तो निव्वळ एक आभास आहे, त्यामागे धाऊ नकोस हे सांगणारे काही कमी नसतात, पण समोर दूरवरून दिसतोय त्याला खोटे कसे म्हणायचे हा प्रश्न आपले मन आभासी सुखाची बाजू भक्कम पणे मांडत असते.मग त्यामागे धावणे आलेच. जेंव्हा अंतर संपत नाही, दमछाक थांबत नाही, थकून जायला होते, आपल्याला कोणी चकवा तर देत नाही हे हळूहळू लक्षात येते तेंव्हा तो आभास आहे हे खचितच जाणवते.. त्याने आपली छळवणूक चालवली आहे हे कुणीतरी सांगितल्याचे लक्षात येते.

अर्थात ही एक मनाची अवस्थाही असते. वास्तवात नसताना असण्याचा भास होणे यातून मनात दडून असलेल्या अनेक गोष्टींची स्वप्नपूर्ती तर होते ना? मग झालं तर. मृगजळ म्हणा हवं तर पण ते क्षणभर सुखावह असतंच की! अखेरच्या क्षणी फसल्याची जाणीव होईपर्यंत ते मिळू पाहणारे आभासी सुख तर आपलेच असते ना ! त्याचा आनंद मिळत नाही असे म्हणून कसे चालेल ? सगळयाच गोष्टी आयुष्यात वास्तवात कशा मिळतील? काही मृगजळासारख्या दूरवर दिसतील, ते मिळवण्यासाठी अकारण दमछाक होईल , मिळणार तर नाहीतच. पण मिळविण्याच्या धडपडींचा आनंद तर मिळेल. मृगजळाच्या दुःखा पेक्षा तो खूप मोठा असेल नक्की.

रायगड जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी कबड्डी स्पर्धेतील विजेता नवजीवन पेझारी संघ बक्षिस घेताना.

रायगड जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत

नवजीवन पेझारी संघ विजेता

। अलिबाग । वार्ताहर ।

रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या वतीने सहाणगोठी येथे आयोजित करण्यात आलेल्या रायगड जिल्हा पुरूष गटाच्या अजिंक्यपद व निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत नवजीवन संघाने प्रथम क्रमांक पटकाविला.

या स्पर्धेमध्ये सेमिफायनमध्ये ज्ञानेश्वर कोलवे संघाने गणेश दिवलांग संघाचा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला. तसेच दुसऱ्या सेमिफायनलमध्ये नवजीवन पेझारी संघाने बजरंग बेली या संघाचा पराभव केला. तर अंतिम फेरी नवजीवन पेझारी व ज्ञानेश्वर कोलवे यांच्यात खेळविण्यात आले. अंतिम फेरीचा सामना उत्कंठा वाढविणारा झाला. खेळ संपायला काही मिनिटे शिल्लक असतांना ज्ञानेश्वर कोलवे या संघाकडे ७ गुणांनी पिछाडी होती, ती पिछाडी मोडित काढत राहुल कोळी याने खेळाचे प्रदर्शन उत्तम करत सामना बरोबरीत सोडविला.

या स्पर्धेत प्रथम क्रमांक नवजीवन पेझारी, द्वीतीय क्रमांक ज्ञानेश्वर कोलवे, तृतीय क्रमांक बजरंग बेली तर गणेश दिवलांग या संघांनी पटकाविला.

माजी आ.पंडीत पाटील यांनी या स्पर्धेला सदिच्छा भेट देऊन खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. ही स्पर्धा महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे प्रमुख कार्यवाह व रायगडचे कार्यवाह ॲड.आस्वाद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. स्पर्धेचे पारितोषिक वितरणाला तालुका चिटणीस अनिल पाटील, राज्य कबड्डी असोसिएशनचे निरीक्षक मिनानाथ धानजी यांच्या हस्ते व रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे सहकार्यवाह जे.जे. पाटील, उपाध्यक्ष हिराचंद पाटील, प्रमोद म्हात्रे, रमेश म्हात्रे, संजय मोकल, जगदीश पाटील, नरेश म्हात्रे, प्रमोद ठाकूर, प्रसाद भोईर, गजानन मोरे, लक्ष्मण गावंड, आशिष म्हात्रे, मृणाली मोकल, उल्हास पाटील, जनार्दन पाटील, हिरामण भोईर व आदी पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

महत्त्वाचे

सोनाजी दळवी यांचे निधन

। गोवे-कोलाड । वार्ताहर ।

आंबेवाडी नाका कोलाड येथील रहिवासी सोनाजी भाऊ दळवी यांचे अल्पशा आजाराने बुधवारी (दि.१५) निधन झाले.

विद्युत वितरण कंपनीमधून ते सेवानिवृत्त झाले होते. त्यांच्या पश्चात पत्नी, भाचे, सुना, नातवंडे मोठा परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी शुक्रवारी (दि.२४) उद्धर रामेश्वर येथे तर उत्तरकार्य रविवारी (दि.२६) आंबेवाडी नाका कोलाड येथे त्यांच्या राहत्या घरी होणार आहे.

श्रीवर्धनमध्ये क्रिकेटचा खेळ बेतला जीवावर

। अलिबाग । शहर प्रतिनिधी।

श्रीवर्धन येथे मौजे वाळवटी येथे आरोपी रा.वाळवटी यांनी क्रिकेट खेळताना झालेल्या बाचाबाचीचे रूपांतर मारहाणीमध्ये झाले. अधिक मिळालेल्या माहितीनुसार क्रिकेट खेळत असताना फिर्यादी रा.वाळवटी खुर्द याचा भाऊ याने त्याला घरी जाण्यास सांगितले. तो राग मनात धरून त्याने कोयता घेऊन फिर्यादी व त्याच्या भावाला कोयत्याने मारून दुखापती केल्या. नंतर थोड्या वेळाने आरोपीने झालेल्या भांडणाचा राग मनात धरून फिर्यादी यांच्या घरासमोर हातात सुरा घेऊन फिर्यादी याच्या भावाला सुऱ्याच्या लाकडी मुठीने गळ्यावर मारून त्याच्या हातवर चावा घेउन पळुन गेला तसेच जात असताना त्याने तुम्हाला बघुन घेईन अशी धमकी दिली. याबाबत श्रीवर्धन पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहाय्यक फौजदार एस.बी.माने हे करीत आहेत.

कबड्डी स्पर्धेसाठी संघ जाहीर

अदिती काविलकर, हर्ष मेहरवर नेतृत्वाची धुरा

। मुंबई । प्रतिनिधी ।

मुंबई शहर कबड्डी असो. ने परभणी येथे होणाऱ्या राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेकरिता आपले किशोर व किशोरी गटाचे संघ जाहीर केले. अदिती काविलकरकडे किशोरी, तर हर्ष मेहरकडे किशोर गटाच्या संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी सोपविण्यात आली.

नुकत्याच झालेल्या जिल्हा निवड चाचणी कबड्डी स्पर्धेतून हा संघ निवडण्यात आला असून तो दि.२० ते २२ डिसेंबर या



कालावधीत होणाऱ्या परभणी येथील राज्य अजिंक्यपद निवड चाचणीत मुंबई शहराचे प्रतिनिधीत्व करणार आहे.

किशोरी गट : अदिती काविलकर संघनायिका, जयश्री नाविक उपसंघनायिका, समीक्षा जाधव, प्रसिद्धी गुरव, सृष्टी सोनावणे, खुशी आरडे, सई शिंदे, अस्मिता जंगम, सलोनी पाटील, स्नेहा बोरगे, वैष्णवी रेडीज, निशा रमण.

किशोर गट : हर्ष मेहर संघनायक, दिवेश गवळी उपसंघनायक, निकेश करकरे, आदित्य म्हात्रे, अल्केश निचोरे, साई चौधुले, दुर्वेश चव्हाण, रितेश शर्मा, विशाल घाडगे, मंथन सावंत, रमेश रायकर, आर्यन हजारे.

श्रीकांत कवळे यांना पुरस्कार

। नवी मुंबई । वार्ताहर ।

बृहन्मुंबई पेन्शनर्स असोसिएशन मुंबई व शारदा प्रकाशन ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्र मुंबई येथे आयोजित केलेल्या पेन्शनर्स डे चे औचित्य साधून पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने, जगविख्यात नेत्रतज्ञ यांच्या हस्ते श्रीकांत कवळे, नायब तहसीलदार यांना ललित लेखन या सदराखाली, त्यांच्या अंतरंग मनाचे या पहिल्या पुस्तकासाठी महाराष्ट्राचे ज्ञानपीठ पुरस्कार विजेते आणि यायाती या असामान्य कादंबरीचे

लेखक स्वर्गीय वि.स.खांडेकर साहित्यिक पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. या पुरस्कारानिमित्त विविध स्तरातून कवळे यांच्यावर स्तुती सुमनांचा वर्षाव होत आहे.

'गंगा एक्सप्रेस वे'ची पायाभरणी

वर्षा मेहता
। अलिबाग ।

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी उत्तर प्रदेशातील शाहजहांपूर येथून ५९४ किलोमीटर लांबीच्या सहा पदरी गंगा एक्स्प्रेस वेची पायाभरणी केली. ३६,२०० कोटींहून अधिक खर्च करून बांधलेला, हा राज्यातील सर्वात लांब द्रुतगती मार्ग बनेल अशी माहिती उत्तर प्रदेश सरकारने दिली आहे. आर्थिक विकासाच्या दिशेने मोठ्या प्रमाणात चालना देण्यासाठी, गंगा एक्स्प्रेस वे पुढील वर्षी महत्त्वाच्या उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीपूर्वी भारतीय जनता पक्षाच्या विकास कामात भर घालणार आहे. पंतप्रधान कार्यालयाने जारी केलेल्या निवेदनानुसार, देशभरात जलद गतीने कनेक्टिव्हिटी प्रदान करण्याच्या पंतप्रधान मोदींच्या संकल्पनेवर हा एक्स्प्रेस वे

हॅशटॅग गंगा एक्स्प्रेस वे ट्रेंड

SOCIAL MEDIA पडसाद

बांधला जात आहे.

गंगा एक्स्प्रेस वे दिल्ली ते प्रयागराज दरम्यानचा प्रवास वेळ फक्त ७ तासांवर आणणार आहे. यूपी सरकारच्या दाव्यानुसार हा एक्स्प्रेस वे देशातील सर्वात लांब असल्याचेही म्हटले जात आहे. औद्योगिक विकास, व्यापार, कृषी, पर्यटन इत्यादींसह अनेक क्षेत्रांना चालना देण्यासाठी गंगा द्रुतगती मार्गाजवळ एक औद्योगिक कॉरिडॉर तयार करण्याचा प्रस्ताव देखील देण्यात आला आहे.

रितेश देशमुखच्या 'वेड' नावाच्या नवीन मराठी चित्रपटाची शूटींग अलिबागमधील नागोठणे टाउनशिप येथे सुरू असून रितेश देशमुख हा शूटींगसाठी तिथे हजर झाला आहे. या चित्रपटाच्या लोकल प्रोडक्शनचे काम हे अलिबागमधील एस.के. प्रोडक्शन बघत आहेत.

उरण येथे शरीरसौष्ठव स्पर्धा

। उरण । वार्ताहर ।

रायगड जिल्हा हौशी शरीर सौष्ठव संघटनेच्या मान्यतेने द्रोणागिरी स्पोर्ट्स क्लब पुरस्कृत द्रोणागिरी श्री २०२२ व द्रोणागिरी फिजिक्स २०२२ शरीरसौष्ठव स्पर्धेचे आयोजन पावर हाऊस, उरण यांच्या सहकार्याने उरण येथे सोमवार, दि. ३ जानेवी रोजी करण्यात आले आहे.

आयोजकांनी दिलेल्या माहितीनुसार, ही स्पर्धा बोकडवीरा, चारफाटा, एनएमएसइझेड मैदान, पेट्रोलपंपा जवळ, उरण येथे संध्याकाळी ५ वाजल्यापासून सुरु होईल. रायगड जिल्ह्यातील शरीर सौष्ठवपटूंना या स्पर्धेत सहभागासाठी आवाहन करण्यात आले असून, अधिक माहितीसाठी संतोष साखरे ९४२११६४०८४, जीतेंद्र गुरव ९९२०४४४३५१ यांना संपर्क साधण्याची सूचना आयोजकांकडून करण्यात आली आहे.

५१ वे पुण्यस्मरण

आगरी समाजातील एकमेव चुनाभट्टीवाली महिला उद्योजिका
कै.सीताबाई रामचंद्र गायकर
देवाज्ञा श्री.दत्त जयंती मार्गशीर्ष पौर्णिमा दि.१२ डिसेंबर १९७०

पुण्यतिथी निमित्त भावपुर्ण आदरांजली

पतवंडे - श्री.नृपाल दत्तात्रेय घरत, सौ.मृणालिनी घरत
खापर पतवंडे- कु.तनीश दंताळे, कु.प्रतोष घरत

सह्याद्री प्रतिष्ठानतर्फे ३७ वीरांचा सन्मान

। रेवदंडा । वार्ताहर ।

अलिबाग तालुका सह्याद्री प्रतिष्ठानच्या वतीने शौर्या तुला वंदितो कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येऊन मान्यवरांच्या हस्ते ३७ वीरांचा सन्मान करण्यात आला.

अलिबाग तालुका सह्याद्री प्रतिष्ठानच्या वतीने या कार्यक्रमाचे सहाण बायपास रोड येथील श्री मंगल कार्यालयात आयोजन केले होते. या कार्यक्रमास २५० हून अधिक सेनानी व नागरिकांनी उपस्थिती नोंदविली होती. या कार्यक्रमास उपस्थित वीरांचे तसेच

मान्यवर व नागरिकांचे सह्याद्री प्रतिष्ठान अलिबागच्या वतीने जिल्हा अध्यक्ष संजय पाडेकर व तालुका अध्यक्ष सिद्धेश शेवणईकर यांनी आभार व्यक्त केले.

हाशिवरे येथे डायरेक्ट व्हॉलीबॉल स्पर्धा

विजेत्या संघांना मिळणार आद्य सप्लायर्स चषक

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

अलिबागेत रविवारी हाशिवरे येथील महात्मा गांधी विद्यालयाच्या क्रीडांगणावर दुसरी जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी डायरेक्ट व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन अमित नाईक मित्रमंडळ सारळ आणि आद्य सप्लायर्स म्हात्रोळी यांच्या वतीने करण्यात आले आहे. या स्पर्धेत विजेत्या संघांना आद्य सप्लायर्स चषक देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

व्हॉलीबॉल या खेळाचे महत्त्व रायगड जिल्ह्यातील खेडोपाड्यात राहणाऱ्या तरुणांना कळावे या मुख्य हेतूने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याचे आयोजक अमित नाईक यांनी सांगितले. या स्पर्धेला पुरुष आणि महिला असे मिळून जवळपास ५० संघ सहभागी होणार असल्याचे सांगून ही स्पर्धा डायरेक्ट व्हॉलीबॉल असोसिएशन रायगड जिल्हा यांच्या मान्यतेने आयोजित करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

स्पर्धेचे पारितोषिक वितरण रविवारी संध्याकाळी करण्यात येणार आहे. बाद पद्धतीने खेळविण्यात येणाऱ्या या निवड चाचणी स्पर्धेतून विजेत्या संघाची निवड राज्यस्तरीय स्पर्धेसाठी करण्यात येणार आहे. दरम्यान स्पर्धेचे पारितोषिक वितरण पोयनाड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल अतिग्रे आणि मांडवा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राजीव पाटील यांच्या हस्ते करण्यात येणार आहे अशी माहिती आयोजक अमित नाईक यांनी दिली.

अप्रगत मुलांसाठी विकासात्मक शैक्षणिक उपक्रम

। कर्जत । प्रतिनिधी ।

अप्रगत विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी कर्जत तालुक्यातील प्राथमिक शिक्षकांचे एक पाऊल पुढे अप्रगत मुलांचा दवाखाना या नाविण्यपूर्ण शैक्षणिक उपक्रमाचे उद्घाटन नुकतेच करण्यात आले.

कर्जत तालुक्यातील केंद्र खांडपे येथे शिक्षण परिषदेत ग्रुप ग्रामपंचायत खांडपे सरपंच, गिता पब्लिक हायस्कूलच्या मुख्याध्यापिका नमिता सुधाकर घारे यांच्या हस्ते अप्रगत मुलांचा दवाखाना या नाविण्यपूर्ण

कर्जत प्राथमिक शिक्षकांतर्फे उपक्रमाचे उद्घाटन

शैक्षणिक उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी शैक्षणिक विचार मंचावर केंद्रप्रमुख राजेंद्र आढाव, प्रमुख वक्ते निंबाजी गिते, मालू गायकवाड, माधवराव निकुंभ उपस्थित होते.

अध्ययनस्तर सद्यस्थिती पडताळणी करून खांडपे केंद्रात अक्षर स्तर व संख्या ज्ञान यावर प्रभावीपणे काम केले जाणार आहे. या उपक्रमाचे उद्दिष्ट अप्रगत मुलांना प्रगत करणे असे असून ही कल्पना राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक वेच्या गावित यांची आहे. कर्जत तालुक्यातील अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघ शाखा या शिक्षकांच्या संघटनेने या उपक्रमास पाठिंबा दिल्याचे संघटनेचे कर्जत तालुका अध्यक्ष मनोहर भोसले यांनी सांगितले. अखिल प्राथमिक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष राजेंद्र आढाव व सचिव अभिजित वाणी उपस्थित होते.

आगरी चषक महोत्सवास प्रारंभ

। खांब-रोहे । वार्ताहर ।

रोहे तालुका आगरी ज्ञाती सेवा मंडळ रोठ ग्रुप यांच्या वतीने आगरी चषक व आगरी महोत्सवास उत्साहात प्रारंभ करण्यात आला आहे.

यामहोत्सवाचेउद्घाटन अध्यक्ष हरिश्चंद्र मोरे, उपाध्यक्ष रोहिदास कोल्हटकर, खेळू वारगे आदींच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सचिव रामचंद्र मोरे,देवराम कर्णे कर, खजिनदार सचिन मोरे,विलास डाके, कार्याध्यक्ष लक्ष्मण मोरे, दिलिप वारंगे, सल्लागार किशोर मोरे, अमित घाग, जनार्दन मोरे, रोठ खु.सरपंच गीता मोरे आदींसह मोठ्या संख्येने समाजबांधव व भगिनी उपस्थित होते. या स्पर्धेत प्रथम क्रमांक ७७ हजार ७७७ रूपये व आकर्षक चषक, द्वितीय ४४ हजार ४४४ रूपये व आकर्षक चषक, तृतीय व चतुर्थ क्रमांक अनुक्रमे २२ हजार २२२ रूपये व आकर्षक चषक तसेच मालिकावीर खेळाडूस एलईडी टिव्ही व उत्कृष्ट फलंदाज, गोलंदाज यांना कुलर बक्षिस देण्यात येणार आहे. या महोत्सवाची सांगता मिरवणुकीने करण्यात येणार असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

कृषीवल

क्रीडा संघटनांना आवाहन

रायगड जिल्ह्यात विविध क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या जात आहेत. त्यामुळे क्रीडाक्षेत्रात नैपुण्य मिळविण्याची संधी खेळाडूंना मिळत आहे. त्यामधून क्रीडापटू तयार व्हावेत आणि त्यांना यथायोग्य प्रसिद्धी लाभावी यासाठी कृषीवलतर्फे सर्वच क्रीडा स्पर्धांच्या आयोजनाची तसेच स्पर्धा झाल्यानंतरचे वृत्त कृषीवलमध्ये विनामुल्य प्रसिद्ध केले जाणार आहे. यासाठी सर्व क्रीडा संघटना,आयोजकांना आवाहन करण्यात येते की त्यांनी आयोजित केल्या जाणाऱ्या स्पर्धांची सविस्तर माहिती, स्पर्धेचे उद्घाटन,स्पर्धेचे बक्षिस वितरण आदींची माहिती कृषीवलकडे krushivalnews@gmail.com या मेलवर पाठवावी.त्यास तातडीने प्रसिद्धी दिली जाईल.

स्पर्धेसाठी माध्यम प्रायोजकबाबत कृषीवल कार्यालयाशी संपर्क साधावा.

- मुख्य संपादक



भगवद्गीता स्पर्धा

हजारो वर्षांची परंपरा लाभलेल्या भगवद्गीतेचे महत्त्व भावी पिढीलाही ज्ञात व्हावे, हा उदात्त दृष्टिकोन समोर ठेवून इस्कॉन 'हरे कृष्ण' नामहट, अलिबाग केंद्रातर्फे विद्यार्थी तसेच खुल्या गटासाठी भगवद्गीता पाठांतर स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा विनामूल्य असून, विजयी होणाऱ्यांना रोख बक्षिसेही दिली जाणार आहेत.

विद्यार्थी गट- ५ वी ते १० वी,
खुला गट- ११ वी ते पुढे (मुला/मुलींसाठी)
दैनिक कृषीवलमध्ये दररोज छापून येणाऱ्या भगवद्गीतेतील प्रत्येक अध्यायानंतर १० प्रश्न विचारले जातील. त्याची उत्तरे दोन्ही गटांनी द्यायची आहेत. प्रत्येक गटासाठी पुढीलप्रमाणे बक्षिसे दिली जातील.
(प्रथम क्रमांक ५ हजार रुपये, द्वितीय ३ हजार रुपये, तृतीय २ हजार रुपये, उत्तेजनार्थ १ हजार रुपये)
अधिक माहितीसाठी तसेच प्रश्नाची उत्तरे सादर करण्यासाठी खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

श्री. गुरुनाथ बळीराम नाईक, पत्ता- संत रोहिदास नगर, 'वृंदावन' घर क्र. ७२, चेंढरे कावेरी बिल्डींग समोर ९४२३०४१०८१
पाठांतर केलेले श्लोक सादर करण्याची वेळ व ठिकाण वेळोवेळी जाहीर केले जाईल.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ. चित्रलेखा पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-20 (31-12-2021)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर ■ मुख्य संपादक : इब्राहीम अफगाण* ■ डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)